


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६३ वे * अंक ३०७ * नांदेड * गुरुवार, दि. १४ नोव्हेंबर २०२४ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यात सरासरी ६४.८६ टक्के मतदान



**नवी दिल्ली–** झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात १५ जिल्ह्यांतील ४३ जागांसाठी मंगळवारी मतदान पार पडले. बुधवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ६४.८६ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

याचबद्दल माहिती देताना मुख्य निवडणूक अधिकारी के. रवी कुमार यांनी सांगितले की, ४३ विधानसभा मतदारसंघात कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत आज सकाळी ७ वाजता मतदान सुरू झाले आणि शांततेत मतदान सायंकाळी ५ वाजता संपले. ते म्हणाले की, ९५० बूथवर मतदान ४ वाजता संपले, पण इतर मतदान केंद्रांवर मतदान ५ वाजता संपले. या ४३ विधानसभा मतदारसंघातील मतदान संपेपर्यंत ६४.८६ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

बहरगोरा विधानसभेच्या जागेवर राज्यात सर्वाधिक ७६.१५ टक्के मतदान झाले आहे. रांची जिल्ह्यातील पाच जागांवर बोलायचे झाले तर एकूण ६०.४९ टक्के लोकांनी मतदान केले. या जिल्ह्यात मंदार विधानसभेच्या जागेवर सर्वाधिक मतदान झाले. येथे ७२.१३ टक्के मतदान झाले. यानंतर तामार जागेसाठी ६७.१२ टक्के मतदान झाले. हातिया विधानसभा जागेवर ५८.२० टक्के लोकांनी मतदान केले. तर कानके विधानसभा मतदारसंघ ५७.८९ टक्के मतांसह चौथ्या स्थानावर राहिला. या बाबतीत रांची पिछाडीवर असून, येथे फक्त ५१.५० टक्के मतदान झाले. मात्र, निवडणूक आयोगाची अंतिम यादी जाहीर झाल्यावर या आकडेवारीत किरकोळ बदल होण्याची शक्यता आहे.

याआधी मंगळवारी सायंकाळपर्यंत मतदान कर्मचारी नियुक्त केलेल्या बूथवर पोहोचले. १७ सर्वसाधारण जागांसाठी, ६ अनुसूचित जाती आणि २० अनुसूचित जमातीच्या जागांसाठी एकूण ६८३ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये ६०९ पुरुष, ७३ महिला आणि एका तुतीयपंथी उमेदवाराचा समावेश आहे.

## शासनाकडून २० नोव्हेंबर रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर

**मुंबई–** राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होत असून २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे, राजकीय नेत्यांनी प्रचारसभांचा आणि गाठीभेटींचा धडाकाच सुरू केला आहे. त्याच पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगही जोमाने कामाला लागले असून भरारी पथके, स्थिर पथके, पोलीस यंत्रणा व प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून मतदानाचा टक्का वाढवा यासाठी जनजागृती करत आहे. विशेष म्हणजे राज्य निवडणूक आयोगानेही यापूर्वी विधानसभा निवडणुकांमध्ये मतदानाचा टक्का वाढावा यासाठी मतदानादिवशी सार्वजनिक सुट्टी देण्यात येत असल्याचं सांगितलं होतं. तसेच, राज्यातील कामगार आयुक्तांना तसे निर्देशही दिले होते. आता, राज्य सरकारकडून परिपत्रक जारी करत २० नोव्हेंबर रोजी राज्यात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदान दिनी २० नोव्हेंबर रोजी सुट्टी जाहीर झाली आहे. त्यानुसार, क्रमांक सार्वसु–१०२४/१२६ (२९) लेखअधिनियम, १८८९ (१८८९चा २६) च्या कलम २५ नुसार भारत सरकारच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक ३१/१/६८ जेयुडीएल तीन दिनांक ८ मे १९६८ अन्यये महाराष्ट्र शासनास सोपविण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुका–२०२४ च्या अनुषंगाने बुधवार दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी सर्व विधानसभा मतदारसंघानिक सुट्टी करीत आहे, असे परिपत्रकच राज्य शासनाच्यावतीने करण्यात आला आहे.

## काँग्रेस नेते राहुल गांधी यांची आज नांदेडमध्ये जाहीर सभा



**नांदेड–** नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीतील महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा.रविंद्र चव्हाण व नांदेड जिल्ह्याच्या विधानसभा निवडणुकीतील महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ काँग्रेस नेते खा. राहुल गांधी यांची गुरुवार, दि.१४ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता नवा मोंढा मैदानावर जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेला महाविकास आघाडीचे राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय दिग्गज नेत्यांची उपस्थिती लाभणार आहे.

काँग्रेसचे नवा मोंढा स्थित कार्यालयात बुधवारी झालेल्या पत्रकार परिषदेत तेलंगणाचे माजी मंत्री शब्बीर अली यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, खा.राहुल गांधी यांच्या सभेला १ लाखाहून अधिकचा जनसमुदाय उपस्थित राहील, अशी अपेक्षा असून सभेची जय्यत तयारी करण्यात आली आहे. राज्यात महाविकास आघाडीसाठी अनुकुल वातावरण असून महायुती सरकारच्या भ्रष्ट कारभाराला जनता वैतागली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे विकासाचा कुठलाच अजेंडा नाही, त्यामुळे महाराष्ट्रात जिथे ते जातात तिथे काश्मीरचा मुद्दा उपस्थित करतात. महाराष्ट्र आणि काश्मीरचा संबंध काय? असा सवाल करून ते म्हणाले, जम्मू–काश्मीरच्या जनतेने भाजपला नाकारले ही वस्तुस्थिती आहे.

या पत्रकार परिषदेला तेलंगणाचे खासदार सुरेश शेटकार, काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्या श्रीमती जरीता, माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर,माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, श्याम दरक, जिल्हाध्यक्ष बी.आर.कदम, प्रवक्ते मुन्तजीब आदींची उपस्थिती होती.

## कारची ट्रकला भीषण धडक, एकाच कुटुंबातल्या पाच जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली–** रस्त्याच्या कडेला थांबलेल्या ट्रकला मागून धडक दिल्याने कारमधील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. मृत्यू झालेले सर्वजण एकाच कुटुंबातील असल्याची माहिती समोर येत आहे. हा भीषण अपघात झाला असून यात कारचा चक्काचूर झाला आहे. घटनास्थळी रक्तामांसाचा चिखल पडला होता. ट्रक नादुरुस्त झाल्यानं रस्त्याच्या कडेला थांबवण्यात आला होता. त्या ट्रकला मागून कारने धडक दिली. ग्रेटर नोएडा एक्सप्रेस वेवर हा अपघात झाला.



**नांदेड** : अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथे भोकर विधानसभेच्या भाजप महायुतीच्या उमेदवार श्रीजया चव्हाण यांच्या प्रचारार्थ केंद्रीयमंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांची सभा झाली. यावेळी व्यासपीठावर माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, सचिन साठे, भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांची उपस्थिती होती. (छाया : करणसिंह बैस)

## महायुतीचे उमेदवार चिखलीकर यांच्या प्रचारार्थ धनंजय मुंडे आज माळाकोळीत



**लोहा–** लोहा विधानसभा मतदारसंघाचे महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची आज गुरुवारी माळाकोळी येथे जाहीर सभा होणार आहे.

माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारार्थ माळकोळी येथील श्री बारा ज्योतिर्लिंग मंगल कार्यालय माळाकोळी येथे दुपारी १२ वाजता प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महायुतीतील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री शिंदे, अजित पवार व नाना पटोले यांच्या बॅगांची तपासणी

**मुंबई–** राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. विधानसभा निवडणुकीमुळं राज्यातील राजकारण चांगलंच तापलंय. तर दुसरीकडं निवडणुकीच्या प्रचारासाठी राज्यातील सर्वच नेते, विविध पक्षांचे प्रमुख स्टार प्रचारक राज्यभर फिरत आहेत. एका मतदारसंघातून दुसऱ्या मतदारसंघात त्वरित पोहोचण्यासाठी हे नेते हेलिकॉप्टरचा वापर करत आहेत. दरम्यान, या निवडणुकीच्या काळात पैशांसह कुठल्याही वस्तूंची ने–आण केली जाऊ शकते. त्यामुळं निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी बॅगा तपासणी सुरू केली. बुधवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची बॅग तपासणी करण्यात आली.

महायुतीचे उमेदवार राजेंद्र गावित यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पालघरमध्ये जाहीर सभा घेण्यात आली. या सभेपूर्वी पालघर येथील पोलीस मैदानात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचं हॅलिकॉप्टर येताच, निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या बॅगांची झाडाझडती घेतली. यावेळी, मुख्यमंत्र्यांनी झाडाझडती घेणाऱ्या अधिकाऱ्यांना उद्देशून उद्धव ठाकरेंना टोला लगावला. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या बॅगची तपासणी निवडणूक अधिकाऱ्यांकडून करण्यात आली आहे.

याचबरोबर भंडारा विधानसभेच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी नाना पटोले हे बुधवारी भंडाऱ्यात हेलिकॉप्टरने दाखल झाले. शहापूर इथं हेलिकॉप्टरमधून उतरताच त्यांच्या बॅग चेकिंग करण्यात आल्या. यवतमाळ इथं नाना पटोले यांच्या सोबत काहीही नसलं तरी त्यानंतरच्या प्रवासादरम्यान त्यांनी भंडाऱ्याकडे प्रस्थान करताना हेलिकॉप्टरमध्ये भोजन केलं. त्यामुळं त्यांच्या हेलिकॉप्टरमधील बॅगमध्ये पथकाला भोजन करण्याच्या प्लास्टिकच्या प्लेट्स आणि औषधी मिळाली. यावेळी नाना पटोले यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर निशाणा साधला.

नाना पटोले म्हणाले की, अमित शाह, नरेंद्र मोदी आणि योगींच्याही हेलिकॉप्टर उतरल्यानंतर बॅगाची तपासणी व्हायला पाहिजे. नियम सगळ्यांसाठी सारखा आहे, असे ते म्हणाले.

## नांदेडमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख आणि शहरप्रमुखामध्ये फ्री स्टाईल हाणामारी; प्रकरण पोहोचले भाग्यनगर पोलीस ठाण्यात

**नांदेड–** विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये अगोदरच उमेदवारी मिळाली नसल्याने चलबिचल होती. एकमेकांबद्दल समन्वयाचा अभाव नसल्याने यातूनच अखेर बुधवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी शहराच्या छत्रपती चौक परिसरातील एका हॉटेलमध्ये जिल्हाप्रमुख आणि शहरप्रमुख यांच्यात फ्री स्टाईल हाणामारी झाली. यानंतर शहरप्रमुखाने भाग्यनगर पोलीस ठाणे गाठले. सध्यातरी हे प्रकरण पोलिसांनी चौकशीवर ठेवले आहे.

शहरातील छत्रपती चौकात असलेल्या मिंट हॉटेलमध्ये बुधवारी दुपारी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये बाचाबाची होऊन हाणामारी झाली. या हाणामारीनंतर दोन्ही पदाधिकाऱ्यांनी वरिष्ठांकडे तक्रार केली असल्याची माहिती समोर आली आहे.



नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार संगीता विठ्ठल पाटील डक यांना अचानकपणे ए–बी फॉर्म प्राप्त झाला आणि उमेदवारी मिळाली. त्यानंतर वरिष्ठ नेत्यांनी देखील नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाची निवडणूक मैत्रीपूर्ण असल्याचे जाहीर केल्यानंतर निष्ठावंत शिवसैनिकांत एकच गोंधळ निर्माण झाला. शहरप्रमुखाने निष्ठावंतांची नावे पुढे केली नाहीत, त्यामुळे विठ्ठल पाटील डक यांच्या सौभाग्यवती संगीता डक यांना उमेदवारी मिळाली असल्याचा आरोप करण्यात आल्यानंतर काही शिवसैनिक याचा जाब विचारत असतानाच चांगलीच बाचाबाची झाली. त्यामधील एका पदाधिकाऱ्याला कपडे फाटेपर्यंत मारल्यामुळे शिवसैनिक चांगलेच संतापले. अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्यानंतर डक यांनी संबंधित पदाधिकाऱ्याला आपल्या गाडीत घालून नेले.

दोन दिवसांपुर्वी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नांदेडमध्ये येऊन पदाधिकाऱ्यांमध्ये सामंजस्य घडवून आणले होते. त्यानंतर देखील असा प्रकार घडला आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# राजकारणात सामान्य माणूस कुठे?

विधानसभांच्या निवडणुकांचा जागर सुरू झाला आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने लोकसभेच्या निकालाकडे विधानसभेची 'ब्ल्यू प्रिंट' म्हणूनच पाहिले जात होते. एकूण निकाल पाहून सगळेच पक्ष जागे झाले आहेत. टिकून राहायचे असेल तर आपल्याला बदलायला हवे, हे त्यांना कळून चुकलेय. इतकी वर्षे राजकारण केवळ आश्वासनांपुरते असायचे. निवडणुकीपूर्वी मतदार 'राजा' असायचा नंतर मात्र नाही. त्याला अजूनही काही मिळालेले नाही, याची जाणीव उमेदवारांना व्हायची आणि मग 'हे देऊ की, ते देऊ' असे सांगून गेलेल्या 'त्या' उमेदवारावर विश्वास ठेवून मतदार निवडून यायचा. मग तो उमेदवार दिलेली आश्वासने विसरून जायचा. त्याला स्वतःचेही काहीतरी बघायचे असते आणि शेवटी लोकांना सगळेच दिले, तर मग पुढच्या वेळी कशाच्या जोरावर मते मागायची? हा प्रश्नही आहे. त्यामुळे एकदा आश्वासने देऊन गेलेला उमेदवार पुन्हा पुढच्या पाच वर्षांनीच दृष्टीला पडतो. तोवर आपल्याला नक्की काय हवे होते, हे लोक विसरून गेलेले असतात. अर्थात तरीही अगदीच काहीच होत नव्हतं असं मात्र नाही. खरे तर सामान्य माणसाच्या अपेक्षा अगदी मर्यादित असतात. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, सुरक्षितता आणि सुखाने जगणे एवढेच सामान्य माणसाला हवे असते. देश स्वतंत्र होऊन ७७ वर्षे झाली आणि तेव्हापासून लहान -मोठ्या प्रत्येक गावातून नगरसेवक, आमदार, खासदार अशी वरपर्यंत पोहोचलेल्या आणि लोकांनीच निवडून दिलेल्या नेत्यांची साखळी आहे; पण तरीही इतक्या वर्षांनंतरही स्त्रियांना संरक्षण, प्रत्येक हाताला काम, प्यायला शुद्ध पाणी, विनाशुल्क शिक्षण, राहायला घरे, स्वयंपाकासाठी गॅस, गरिबांना नव्हे तर, प्रत्येक घराला शौचालयासारख्या प्राथमिक गरजाही पूर्ण झाल्या नाहीत आणि आजही हीच आश्वासनं देऊन, नेते पुन्हा पुन्हा 'मतदारराजा'ला भेटायला जातात. मग या ७७ वर्षांमध्ये या नेत्यांनी आपल्या गावासाठी काय केलं? गेली अनेक वर्षे पाणी, घर, शिक्षण, रस्ते वा मूळ गरजा पुरवण्याची आश्वासने देऊन, हे नेते निवडून येत आहेत. मात्र प्रत्यक्षात आजही कोणत्याही लहान गावातच नव्हे, तर मध्यम किंवा जिल्ह्याच्या गावात गेले तर गावापर्यंत जाणारा धूळ उडवणारा कच्चा रस्ता, सुकत चाललेल्या नद्या, खोल गेलेल्या विहिरी, उघडी गटारे, रिकाम्या शाळा आणि पोट खपाटीला गेलेली अशक्त जनावरे, हेच दृश्य सगळीकडे कमी अधिक प्रमणामध्ये दिसते आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात दिसणाऱ्या या चित्रात आजही फारसा फरक पडलेला नाही. राष्ट्रीय आणि राज्य मार्ग मात्र बऱ्या प्रमाणात चांगली झालेली आहेत एवढाच काय तो फायदा झाला. एक मात्र झाले. या काळात खेड्यातला मतदार शहरात आला. शेतीचे पडत चाललेले तुकडे त्यात कष्टाच्या मानाने हाती फार काही लागत नाही, हे कळले तशी शहरे फुगू लागली आणि खेडी ओस पडू लागली. शहरातल्या सुशिक्षित मतदाराला आता बरेच काही कळायला लागले. आपल्याला नक्की काय हवे आहे आणि ते मिळतेय की नाही आणि कोण देऊ शकेल याबद्दल लोकही जागरूक झाले. त्यातूनच आपल्यावर 'राज्य' करणाऱ्याला बदलू शकतो, हे लोकांच्या लक्षात आलं. खरे सांगायचे तर स्वार्थकेंद्रित झालेल्या या राज्यकर्त्यांना तळागाळात राहणाऱ्या गोरगरीब माणसांना आणि शिकून नोकरी करून मोजक्या उत्पन्नात जगणाऱ्या सामान्यांना नक्की काय हवेय, हे माहीतच नाहीये. किंबहुना माहीत असूनही त्यांना त्याच्याकडे लक्ष द्यायची इच्छाच नाही. किंबहुना सामान्य लोकांचं लक्ष त्यांच्या गरजांपासून विचलित करून, नको त्या गोष्टीकडे वळवत राहण्याचा सर्वच राजकारण्यांचा प्रयत्न दिसतो. राजकारणाचं गुन्हेगारीकरण झालं आहे. अत्यंत खालच्या भाषेमध्ये आरोप-प्रत्यारोप करणे, सत्तेसाठी होणारे पक्षबदल हे जे काही चालू आहे, त्यात देश आणि देशातला सामान्य माणूस नक्की आहे तरी कुठे? प्रत्येक क्षणाला जनतेच्या नावाखाली स्वतःचे मत मांडणाऱ्या या राजकीय पक्षांना त्याचा विचार करायची खरोखर इच्छा आहे का? खरोखरीच सामान्य माणसाला याबद्दल काय वाटते याची जाणीव या नेत्यांना आहे का? आजही पाऊस पडला किंवा नाही पडला तरी सामान्य माणसांचे हाल होतात. आजही आपण दिलेल्या कराचा योग्य उपयोग होत नाही, याची खंत प्रत्येक करदात्याच्या मनात आहे. हा देश कुणीच चालवत नाही, तो आपोआप चालतो, कारण खरोखरीच राज्यकर्ते आणि जनता एकमेकांना समांतर चालतात. जाती धर्माच्या भेदभावांनी राज्यकर्त्यांनी देश पोखरून टाकला आहे. तसे पाहिले तर नव्या पिढीतली मुले आडनाव वापरतच नाहीत; फक्त नाव सांगतात. त्यांना या जातींच्या राजकारणामध्ये खरोखरीच रस नाही; पण राजकारण अजूनही तिथेच आहे. खरे तर देशाच्या हिताच्या गोष्टींसाठी सगळ्या विरोधी पक्षांनी एकत्र येऊन योग्य निर्णय घ्यायला हवा. पण आम्ही विरोधी पक्षात बसतो म्हणून आम्ही विरोध करणार, असा विडाच जणू हे पक्ष स्वीकारतात आणि कोणतेही काम होऊ न देण्यात धन्यता मानतात. संसदेच्या अधिवेशनात काम होऊ द्यायचे नाही, फक्त गोंधळ करायचा, आरडाओरडा करायचा, जमलेच तर धक्काबुक्की करायची; निदानपक्षी सभात्याग करायचा, बहिष्कार घालायचा. एकूण काय, तर काम होऊ द्यायचं नाही. लोकप्रतिनिधींच्या पगाराचा किंवा पेन्शन वाढवायचा ठराव असला की, हेच सगळे अगदी एकमताने अनुमोदन देतात. जनता हे सर्व गेली ७७ वर्षे सगळे सहनही करत आहेत. ते कर भरत आहेत. टोल भरत आहेत. देशाप्रति असलेले कर्तव्य मनापासून बजावत आहेत. आपल्या मुलांना योग्य प्रकारचे, जीवनात उपयोगी पडेल असे शिक्षण मिळेल असे स्वप्न पाहत आहेत. मला सहज कर्ज मिळेल, सरकारदरबारी लायसन्स आणि इतर परवानग्या मिळण्यासाठी असंख्य हेलपाटे घालावे लागणार नाहीत, अशी त्यांची इच्छा आहे. लोकांना हवे आहे भ्रष्टाचारमुक्त आणि सुखी, सुरक्षित जीवन, जे आणि जेवढे कष्ट करू, त्याचे योग्य फळ देणारे आणि कसलीही भीती नसलेले जगणे त्यांना हवे आहे. पण हे आजही स्वप्नच आहे.

# ज्ञानदीप लावू जगी...!



महाराष्ट्राने मंगळवारी प्रबोधिनी एकादशी आणि संत नामदेव महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू संत नामदेव महाराजांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या कार्याचा संक्षिप्त गौरव करतांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, वैचारिक आणि वारकरी संप्रदाय दृष्टीने त्यांचे योगदान अनन्यसाधारण असून सर्वार्थाने त्याचा उहापोह करणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. संत नामदेव आणि एकूणच त्यांच्या घराण्याचा इतिहास मोठा विस्मयकारी आहे. त्यांच्या जन्माच्या अनुषंगाने सुरुवातीला काही वाद-विवाद असले तरी संत नामदेवांचे कुटुंब हे मुळचे हिंगोली जिल्ह्यातील नरसीचे असल्याचे आता सर्वच संशोधकांचे एकमत झाले आहे. वारकरी संप्रदाय आद्यप्रवर्तक कोण? असा प्रश्न केला असता पंढरपूर निवासी कविवर्य श्री मोरोपंत आपल्या सुप्रसिद्ध आर्येत संत नामदेवांच्या कार्याची

श्री नारद मुनीचें जें सुमहवृत्त तेंचि नामदेवाचें ।
याणे प्रसिद्ध केलें विठ्ठल हें भव्य नाम देवाचे ।।

ही महती वाचली की नामदेवांची योग्यता सर्वश्रुत होते. मोरोपंत स्वतः पंढरपुरात वास्तव्यास असतांना त्यांनी आपली एक लांबलचक आर्या संत नामदेवांची महती वर्णन करण्यासाठी खर्ची घातली आहे. यावरून संत नामदेवांचे कार्य सहजच लक्षात येते. पांडुरंगाचे श्री विठ्ठल हे नाव संत नामदेवांनीच सुप्रसिद्ध केले असून पंढरीचा महिमा वाढवण्याचे श्रेय सर्वार्थाने संत नामदेव आणि त्यांच्या समकालीन संतांना जाते. संत नामदेव हे मुळात लढवय्ये होते. नरसी येथून साधारणतः ३०-४० कि.मी.अंतरावरील औंढा नागनाथाच्या दररोज दर्शनाला जाणारे युवा नामदेव सर्वसामान्य लोकांच्या कामाला येत असत. गोरगरिबांना मदत करणारी त्यांची वृत्ती औंढा नागनाथ आणि नरसी पंचक्रोशीत बहुश्रुत होती. असे असतांना त्यांच्या घरात चालू असलेली पंढरीची वारी त्यांच्या वडिलांनी पुढे चालवतांना सतत येणे जाणे नको म्हणून पंढरीला स्थायिक होऊन करायचे ठरवले आणि शिंपी काम करणाऱ्या दामा शेटीचे संपूर्ण कुटुंब पंढरपुरला स्थलांतरीत झाले.

पंढरपूर पूर्णतः सनातन्यांनी घेरलेले होते. सर्वसामान्यांचे दैवत असणाऱ्या श्री विठ्ठलाच्या भक्तीसाठी ब्राह्मणेतरांना विठ्ठल मंदिरात प्रवेश निषिद्ध होता. असे असले तरी मराठवाड्यातून गेलेले, रांगडा पैलवानी बाणा असणारे संत नामदेव तेथील प्रस्थापितांना काकणभर उजवे भरले. नामदेव हे आडदांड आणि दोन दोन हात करण्याची तयारी असणारे असल्यामुळे मंदिरातील पुजाऱ्यांनी काळाचा रागरंग ओळखून नामदेवांना श्री विठ्ठल मंदिरात येऊ दिले असावे. असे असले तरी नामदेवांना मंदिरात भजन-कीर्तन करण्यास मज्जाव करण्यात आला. नामदेव मुळातच क्रांतिकारी वारकरी होते. त्यांना बंड करून आपल्या भक्तीची शक्ती दाखवावी लागणार होती. या अगोदरही नरसी गावातील नृसिंहाला सरळ दुध पाजण्याचा लहानपणचा पराक्रम त्यांच्या नावावर होताच. याचा परिपाक म्हणजे नामदेवांनी पंढरपुरातील आपले भक्तीचे बस्तान पांडुरंगाच्या मंदिरातून उठवून थेट समोरच्या चंद्रभागा नदीच्या वाळवंटात हलवले. या कामात नामदेवांना विविध जातीतील उपेक्षित संतांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यात आपल्या घरातील जेष्ठ असणाऱ्या संत जनाबाई त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभ्या राहिल्या. जनाबाईंनी त्यांना भजन-कीर्तनासाठी उभे करतांना अभंग लिहायला प्रवृत्त केले. याच्या जोडीने गोरा कुंभार, नरहरी सोनार, परिसा भागवत, विसोबा खेचर, जगमित्र नागा, कान्होपात्रा, चांगदेव, जोगा परमानंद, सावता माळी इत्यादी संतानी आपले खंबीर पाठबळ नामदेवांच्या पाठीशी उभे केले. हे सर्वच संत विठ्ठलाच्या भक्तीला पारखे झाले होते. त्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. या सर्वांच्या संगतीने नामदेवाने पंढरपुरचे वाळवंट वारकरी क्रांतीचे केंद्र बनवले. याचकाळात इकडे आपेगाव-पैठणला ज्ञानदेवादी भावडांना धर्ममार्तंडांनी जंग जंग पछाडले होते. पैठणच्या सनातनी धर्ममार्तंडांनी त्यांच्या आई-वडिलांना देहांत प्रायश्चित घ्यायला लावून देखील त्यांना शुद्धीपत्र नाकारले होते. एवढेच काय ज्ञानदेवादी भावडांना आपेगाव-पैठण पंचक्रोशीत भिक्षाटन करण्याची परवानगी नाकारून पंचक्रोशीतून हाकलून लावले. तिकडे पंढरपूरच्या वाळवंटातील नामदेवाची भक्तीच्या शक्तीची क्रांती ऐकल्यामुळे मुळात नाथपंथी असणारी निवृत्ती, ज्ञानदेव, मुक्ताबाई, सोपान ही चारही भावंडे नामदेवाच्या समता-ममता विचारांकडे आकर्षित झाले. संत नामदेवादी संतांना याचे मोठे अप्रूप वाटले. त्यांना आश्रय देतांना अभय देऊन आपल्या बरोबर वारकरी भजन-कीर्तन करण्यास सहकार्य केले. कुलकर्णी ब्राह्मण कुटुंबातील ही चारही भावंडे असल्यामुळे आणि तत्कालीन समाजमनावर वर्णव्यवस्थेचा पगडा असल्या कारणाने सर्वच वारकरी संतांनी ज्ञानदेवादी भावडांना आद्य सन्मान दिला. याचा परिणाम मात्र फार दूरगामी झाला. ब्राह्मणांसह अठरापगड जातीतील सर्वच वारकरी संतांनी आपली वेगळी चूल मांडून श्री विठ्ठलाच्या मंदिरात न जाता वाळवंटातच आपल्या भक्तीचे बस्तान बसवले. वाळवंटात यात्रा भरू लागली. गावागावातून वारकरी नामदेवांच्या क्रांतीला दुजोरा देण्यासाठी वाळवंटात एकत्र जमू लागले.

नामदेवांनी उभारलेल्या नव्या विचारांची आणि अनिर्बंध भक्तीरसाची लोकांना गोडी लागली. त्यात जनाबाई-नामदेवांनी बंदिस्त, संगीत आणि माणसांनी मर्यादित असणारी नारदीय कीर्तन परंपरेला छेद देत खुली उभी वारकरी कीर्तन परंपरा वाळवंटातून सुरु केली. वारकरी कीर्तन ही पुढील वारकरी चळवळीची नांदी ठरले.

यारे यारे लहान थोर।
याती भलत्या नारी नर ।।
करावा विचार।
न लगे चिंता कवणासी ।।

कीर्तनातून असा समतेचा डांगोरा पिटला गेला. वाळवंटातील वारकरी हरी कीर्तनात एका कीर्तनकारासह मृदंगाचार्य, विणेकरी आणि टाळकरी उभे राहिले. वारकरी कीर्तनात कीर्तनकार उभा राहिला आणि खऱ्या अर्थाने वारकरी संप्रदाय आपल्या स्वाभिमानी पाठीच्या कण्यासह ताठ उभा राहिला. विटेवरील श्री विठ्ठलासारखा कीर्तनकार लोकांत उभा राहिला आणि समता-ममतेचे रणसिंग फुंकतांना संत नामदेवांनी


नाचू कीर्तनाचे रंगी।
ज्ञानदीप लावू जगी।।
सर्वांचे ते अधिष्ठान।
तेची माझे रूप पूर्ण।।

अशा अभंगातून ज्ञान, भक्ती, वैराग्याबरोबरच समतेचे आणि प्रेमाचे अधिष्ठान असणारी सर्वसमावेशक भक्ती लोक मनात रुजविण्याचे महत्कार्य केले. याचा परिणाम प्रत्यक्ष नामदेव कीर्तन करी। पुढे देव नाचे पांडुरंग असा झाला. प्रत्यक्ष देवच लेकुरवाळा झाला आणि आपल्या लडिवाळ लेकरांच्या कीर्तनात येऊन बेधुंद नाचू लागला. त्याला त्याच्या पितांबराचे भान राहिले नाही. जनाबाई ज्ञानदेवांना अभंग गायला लावू लागली. एवढेच काय तत्कालीन महार जातीतील चोखामेळा या संताने तर उस डोंगा परी रस नोव्हे डोंगा। काय भुललासी वरिलिया रंगा।। असा रोखठोक अभंग लिहून प्रस्थापितांना विचार करायला प्रवृत्त केले. कुळ जाती वर्ण। हे अघवेची अप्रमाण।। लिहून ज्ञानदेवांनी संस्कृतातील गीता ज्ञानेश्वरीने मराठीत उजागर केली. सामान्यांना कीर्तन, भजन करण्याचा आणि लिहिण्याचा अधिकार मिळाला. ज्ञानाला अनंत पंख फुटले!

मायबापहो, क्रांतिकारक संत नामदेवांचे महाराष्ट्रावर आणि तमाम मराठी रसिकावर अनमोल ऋण आहे. एवढेच काय इथे त्रास होत असतांना तिकडे उत्तरेत पंजाबमध्ये जाऊन तेथील शिखांना आत्मबल देण्याचे महत्कार्य नामदेवांनी केले. असा भारतभर आपल्या भक्तीची शक्ती प्रसारित करणारा महान क्रांतिकारी, कृतीशील भक्त, संत नामदेव म्हणजे मराठी सारस्वताचे जणू दिवा स्वप्नच! नामदेवांच्या घालीन लोटांगण वंदिन चरण अभंगाशिवाय मराठीतील कोणतीही प्रार्थना पूर्ण होत नाही. तेंव्हा मराठी माणसांच्या तनामनात विराजमान असलेले पंढरीरायाचे प्रेमभंडारी, संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या यावच्चंद्रदिवाकरौ ऋणात राहूया! त्यांचा समता-ममतेचा विचार वारकरी संप्रदायात रुजवत राहूया! जय नामदेवराय!

**-प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये**
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो. ९१५८०६४०६८

# आधुनिक भारताचे शिल्पकार : पंडित जवाहरलाल नेहरू



फुले आणि मुले ही पंडित जवाहरलाल नेहरू यांना खूप आवडत असत. निसर्गाच्या सानिध्यात उगवलेली बागेतील गुलाबांची फुले खूप आवडत. त्याचप्रमाणे उद्याची भावी पिढी म्हणजे मुले ही देवाघरची फुलेच आहे त्यामुळे त्यांच्याशी वर्तन सौहार्दाचे असायला हवे. त्यांना लहान मुले खूप आवडत असे म्हणून प्रेमाने मुले त्यांना चाचा नेहरू असे म्हणायचे. चाचा नेहरू यांचा जन्म मोती-लाल व स्वरूपाराणी या दाम्पत्याच्या पोटी श्रीमंत घराण्यात अलाहाबाद (प्रयागराज) येथे १४ नोव्हेंबर १८८९ मध्ये झाला.

पंडित जवाहरलाल नेहरू यांचे शिक्षण घरीच खाजगी शिकवण्यामधून झाले.वयाच्या पंधराव्या वर्षी शिक्षण घेण्यासाठी ब्रिटनमध्ये हॅरो या ठिकाणी गेले. त्यानंतर केंब्रीज विद्यापीठात सामान्य विज्ञानाची पदवी संपादन करून बॅरिस्टर ही पदवी देखील मिळविली. १९१२ ला भारतात परतल्यावर राजकारणाकडे वळले. कारण त्यांचे वडील निष्णात वकील असल्याने त्यांचा देखील ओढा कायद्याच्या शिक्षणाकडे अधिक होता आणि भारतावर इंग्रजांचे राज्य असल्याने परतवून लावण्यासाठी पूर्णवेळ स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला झोकून दिले असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष, स्वातंत्र्य चळवळीचे अग्रणी योद्धे म्हणून नावारूपास आले.

लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेल्या होमरुल चळवळीचे अलाहाबाद येथील ते अध्यक्ष बनले. १९१६ साली महात्मा गांधींची भेट आणि कमला कौल यांच्याशी विवाह त्याच वर्षी झाला. त्यानंतर दुसऱ्याच वर्षी प्रियदर्शनी इंदिरा नावाचे कन्यारत्न प्राप्त झाले. स्वातंत्र्य लढा उभारत असताना महात्मा गांधींशी विचाराशी सहमत होऊन असहकार चळवळीशी बांधले गेले त्यामुळे त्यांना कारावास देखील भोगावा लागला. १९२३ ला चाचा नेहरू यांचे वडील मोतीलाल नेहरू व चित्तरंजन दास यांनी काँग्रेसशी फारकत घेऊन 'स्वराज्य' या पक्षाची स्थापना केली परंतु पाहिजे त्या प्रमाणात जनतेचा प्रतिसाद मिळाला नाही. भारतीय जनतेची गाऱ्हाणे ऐकून त्यावर उपाययोजना आखण्यासाठी लंडनवरून सायमन कमिशन भारतात आले होते, पण भारतीयांनी तीव्र विरोध केला. कारण त्यात एकही भारतीय सभासद नव्हता. सायमन कमिशन 'परत जा' अशा घोषणा करताना लाला लजपतरायसह पंडित जवाहरलाल नेहरूंना देखील लाठी हल्ला सहन करावा लागला. पुढील वर्षी १९२९ ला लाहोर येथे भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून पंडित नेहरूंची निवड करण्यात आली. त्यामध्ये संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव संमत करून २६ जानेवारी हा स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा केला गेला.त्याच दिवसाची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून आजही थाटामाटात साजरा करीत असतो.

पंडित जवाहरलाल नेहरू यांचे वडील मोतीलाल नेहरू (१९३१) व पत्नी कमला नेहरू (१९३५) मध्ये सोडून गेले. त्यामुळे पंडित नेहरू हे एकाकी पडले. त्यांनी इंदिरा गांधीला अनेक पत्रे पाठविली. ती 'इंदिरेस पत्र' म्हणून पुस्तकरूपात आहेत. १९३५ साली उत्तराखंडमधील अलमोरा येथे कारागृहात असताना आपले आत्मचरित्र लिहून काढले आणि पुढील वर्षी फैजपूर येथे (१९३६-३७) साली काँग्रेसचे ग्रामीण अधिवेशन भरले होते त्यात ते अध्यक्ष होते. तसेच अखिल भारतीय कामगार संघटनेचे देखील अध्यक्ष बनल्यामुळे संघटित कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी मदत झाली. त्यावेळी वेगवेगळ्या देशाचे दौरे करून समस्या जाणून घेतल्या. दुसऱ्या महायुद्धात भारताला विचारात न घेता ब्रिटिशांनी भारताला युद्धाच्या खाईत लोटल्याने वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. १९४२ साली गवालिया टँक मैदानावर महात्मा गांधींनी करा किंवा मरा हा नारा दिला तर पंडित नेहरू यांनी भारत छोडो ही क्रांतिकारी घोषणा केली.गर्भश्रीमंत घराण्यात जन्माला आल्यावर देखील नेहरूंनी संपत्तीचा व विदेशी वस्तूचा त्याग करून स्वदेशी वस्तूचा वापर केला.दुसऱ्या महायुद्धात इंग्रजांचा पराभव, सत्ताबदल यामुळे भारतीय स्वातंत्र्याचा ठराव संमत करण्यात आला. त्यावेळी फाळणीला विरोध होत असला तरी बॅरिस्टर जिना यांनी मुस्लिमांसाठी स्वतंत्र देशाची मागणी अखेर नेहरुसह भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला मान्य करावी लागली आणि १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस भारतीय लोकांच्या आनंदाचा, उत्साहाचा, चैतन्याचा ठरला. कारण त्या दिवशी संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले होते.

भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी पंडित नेहरूंना अनेकदा कारावास भोगावा लागला. २ वर्षे ११ महिने व १८ दिवस सर्व संविधान सभेच्या सदस्यांनी चर्चा विमर्ष करून संविधान तयार केले. संविधानाची प्रस्तावना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी लिहिलेली आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता यांची जोपासना करणारा भारत निर्माण करणे हे पंडितजींचे स्वप्न होते. डॉ. राजेंद्र प्रसाद घटनात्मक प्रमुख असताना स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडे बघितल्या जाते. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा बेकारी, दारिद्र्य, उपासमार, गुलामगिरी, जातीभेद, वंशभेद, प्रादेशिक भाषावाद यांसारख्या अनेक समस्या आवासून उभ्या होत्या. साम्राज्य वाढविण्यासाठी इतर देशांनी आक्रमण करू नये यासाठी पंडित नेहरू यांनी १९५४ साली पंचशील तत्वाचा पुरस्कार केला. चीनचे चो. एन. लाय व पंडित नेहरू यांनी पंचशील मार्गदर्शक तत्वाचा अवलंब करण्याचे ठरविले त्यात परस्पर देशांनी सन्मानाने व्यवहार करावा, परस्परांवर आक्रमण करू नये, अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप करू नये, राष्ट्रीय समानता व परस्परांचे हित जोपासणे व शांततामय सहजीवन जगणे तसेच एकमेकांना आर्थिक सहकार्य करणे इत्यादी तत्वे ठरवून दिली होती. तरी देखील १९६२ साली चीनने आक्रमण करून पंचशील तत्वाचे पालन केले नाही व असलेली अपेक्षा फोल ठरली.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देशातील दारिद्र्य संपवून जनतेला समृद्ध जीवन जगता यावे यासाठी समाजवाद स्वीकारला गेला. पंडित नेहरू यांनी डिस्कव्हरी ऑफ इंडिया या मूळ इंग्रजी पुस्तकातून केवळ भारताचा इतिहास नाही तर भारतीय जीवनाविषयीचे चिंतन व ऐतिहासिक घटना विषयीचे स्वतंत्र भाष्य केले आहे. त्याचे मराठी अनुवाद सानेगुरुजी यांनी भारताचा शोध या नावाने केला आहे. पंडित नेहरू हे निष्णात राजकारणीसह स्वतःचे वलय निर्माण करणारे आशावादी व्यक्तिमत्व होते हे त्यांच्या विविध धोरणातून दिसून येते. तत्कालीन काळातील विविध धोरणाची दूरदृष्टी दिसून येत होती.देशातील वंशवाद, साम्राज्यवादाला विरोध दर्शवून जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी अलिप्तवादी धोरणाचा अवलंब करावा हे सर्वांना सांगितले त्यामुळे त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. जगात शांतता नांदावी यासाठी त्यांना शांतिदुत असे देखील म्हटल्या जाते. १९५५ साली भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्या कार्याला व प्रतिमेला विनम्र अभिवादन!

**-दुशांत बाबुराव निमकर**
शब्दांकुर फाऊंडेशन,चंद्रपूर
मो. ९७६५५४८९४९

# बालदिन



आज १४ नोव्हेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक जागतिक पातळीवर २० नोव्हेंबरला बालदिन साजरा केला जातो. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ठरवल्यानुसार, पाहिल्यांदाच बालदिन साजरा करण्यात आला. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्माबाबतचे सामंजस्य वाढवणे तसेच जगभरातील मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे हा त्या मागचा हेतू.

२० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की १९५९ मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने बाल हक्कांची सनद स्वीकारली. शिवाय १९८९ मध्ये याच दिवशी बाल हक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ देशांनी मान्य केले. भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्म दिवस.

१४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहानमुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळ्याविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे

भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील त्यामुळे देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
९९२२५४६२९५

## थोडक्यात...

### हिमायतनगर तालुक्यात दोन दुचाकी चोरीला

**नांदेड–** हिमायतनगर येथील सुदर्शन कलेक्शनसमोर लावलेली (एमएच२६-एझेड- ८९ ३३) दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. सदानंद महादू अनगुलवार यांच्या फिर्यादीवरून हिमायतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच दुसऱ्या घटनेत परमेश्वर मंदिर कमानीजवळून (एमएस २६ एक्स ००८०) ही दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी दत्ता सटवाजी धनवे यांच्या फिर्यादीवरून हिमायतनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील दोन्ही घटनांचा तपास पोलीस हवालदार नागरगोजे करत आहेत.

### उमरी आणि कंधार तालुक्यामध्ये घरफोडी

**नांदेड–** उमरी तालुक्यातील सिंधी येथे घरफोडी करून अज्ञात चोरट्यांनी ४० हजाराचा ऐवज लंपास केला तर कंधार येथील पशुवैद्यकीय दवाखाना फोडून सोलारच्या १३ बॅटऱ्या चोरून नेल्या. याप्रकरणी उमरी आणि कंधार ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिंधी येथे राहुल बालाजी सोनकांबळे यांचे घर फोडून घरातील २६ हजाराचे सहा क्विंटल सोयाबीन व अलमारीतील १४ हजारांचे दागिने असा ४० हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. दुसऱ्या घटनेत कंधार येथील पशुवैद्यकीय रुग्णालयातील सोलारच्या ११ हजार रुपयांच्या १३ बॅटऱ्या चोरून नेल्या. पशुवैद्यकीय अधिकारी दिनेश मनोजसिंग महेर यांच्या फिर्यादीवरून कंधार ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार सानप करत आहेत.

# मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण कदापिही मिळू देणार नाही –प्रकाश शेंडगे

**नांदेड–**राज्यात मागील दीड वर्षापासून गावगाड्यातील जनता पोटाची खळगी भरण्यासाठी एकमेकांच्या सोबतीने राहुन मदतीला धावून जातात. परंतु त्यांच्यामध्ये मराठा आरक्षणाचा मुद्दा निर्माण करून वातावरण भयभीत करून टाकले आहे. प्रस्थापित मराठा समाजाने व त्यांच्या नेत्यांनी जबरदस्तीने ५७ लाख कुणबी दाखले देण्याचा जीआर काढला. ओबीसी आरक्षणावर प्रचंड दबाव टाकला् एससीमध्ये नोकरी प्रमोशन रोखविले. मुस्लिमांचे न्यायालयाने पाच टक्के जाहीर केलेले आरक्षण धोक्यात आणले. मात्र ओबीसींमधून मराठा समाजाला कदापिही आरक्षण मिळू देणार नाही असा इशारा ओबीसी नेते प्रकाशअण्णा शेंडगे यांनी सरकारला लगावला.




नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार श्यामसुंदर शंकरराव जाधव यांच्या प्रचारार्थ प्रकाशअण्णा शेंडगे नांदेड दौऱ्यावर आल्यानंतर ते बुधवारी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

शेंडगे पुढे म्हणाले की, महाराष्ट्रातील ओबीसीसह एससी, एसटी, मुस्लिम समाज सध्या अडचणीत आहे. त्यांच्या हक्काचे आरक्षण पळविण्याचा घाट राज्य सरकारने घातला असून मराठा समाजाच्या नेत्यांनी ओबीसीच्या नेत्यांना खाऊपिऊ घालून त्यांना संपविले. आज ओबीसीच्या नेत्यांची अवस्था बकऱ्यासारखी झाली आहे. त्यामुळे आता ओबीसींनी सावध व्हावे, असे आवाहन ओबीसी नेते प्रकाशअण्णा शेंडगे यांनी केले.

यावेळी भोकर विधानसभेचे अपक्ष उमेदवार नागनाथ घीसेवाड, सुरेश माने, नांदेड लोकसभा उमेदवार नागोराव वाघमारे, सुशीलकुमार जाधव, दत्तात्रय अनंतवार यांची उपस्थिती होती.

प्रकाशअण्णा शेंडगे पुढे म्हणाले की, राज्यामध्ये ८५ उमेदवार ओबीसी बहुजन आघाडीचे आरक्षणवादी आघाडी म्हणून निवडणूक रिंगणात आहेत. आमच्या हातात सत्ता आल्यास सरकारने काढलेले जीआर आम्ही रद्द करणार. प्रस्थापितांना आमच्या उमेदवारांमुळे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनाही आपल्या मुलींना निवडून आणण्यासाठी आमचे नेते नागनाथ घीसेवाड यांच्याशी सामना करावा लागत आहे. मनोज जरांजे पाटील यांना पळता भुई कमी पडली. ते एकही उमेदवार निवडणुकीत उभे करू शकले नाही. आता म्हणतात की, आम्ही गनिमी कावा करू असा टोलाही त्यांनी जरांगे पाटलांना लगावला. मराठा नेत्यांनी ओबीसी नेत्यांना संपवलं. त्यांना खाऊपिऊ घालण्यापेक्षा दुसरे काहीच दिले नाही. ओबीसी समाजाची अवस्था बकऱ्यासारखी झाली आहे. ओबीसीचे आरक्षण हे घटनात्मक आहे. त्याला कोणीही हात घालू शकत नाही. परंतु मराठा आरक्षण कायदेशीर बाब असल्याचे सुरेश माने यांनी सांगितले. गावागावांमध्ये, समाजामध्ये वाद निर्माण करून राज्यातील सामाजिक परिस्थिती सत्ताधाऱ्यांनी भयभीत करून टाकली असल्याचे सुरेश माने शेवटी म्हणाले.

यावेळी अपक्ष उमेदवार श्याम जाधव यांना मतदारांनी व ओबीसी समाजाने मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन शेंडगे यांनी केले आहे.

# प्रा. रविंद्र चव्हाण, आ. हंबर्डे यांना विजयी करावे –खा. इमरान प्रतापगढी

**नांदेड–** नांदेड दक्षिणचे आमदार मोहनराव हंबर्डे यांनी कोरोना काळात गोरगरीबांना केलेली मदत कौतुकास्पद आहे. त्यांना या मतदारसंघातून पुन्हा प्रचंड मतांनी विजयी करून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन करण्यासाठी मतदानाच्या माध्यमातून योगदान द्या. महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा.रविंद्र चव्हाण यांना लोकसभेत पाठविण्याची जबाबदारी आता तुमची आहे, असे आवाहन काँग्रेसचे राज्यसभा खासदार इमरान प्रतापगढी यांनी केले.



नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचे महाविकास आघाडीचे उमेदवार प्रा.रविंद्र चव्हाण व नांदेड दक्षिणचे महाविकास आघाडीचे उमेदवार आ. मोहनराव हंबर्डे यांच्या प्रचारार्थ करबला येथील जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी प्रा.रविंद्र चव्हाण, आ. मोहनराव हंबर्डे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

खा. प्रतापगढी पुढे बोलताना म्हणाले, नांदेड हा काँग्रेसचा बालेकिल्ला आहे हे या भागातील जनतेने पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत वसंतराव चव्हाण यांना विजयी करून सिद्ध करून दाखविले. खा.वसंतराव चव्हाण यांची आणि माझी दिल्लीत भेट झाली. मी राज्यसभेत आणि ते लोकसभेत जनतेचा आवाज उठवणार होतो, परंतु, दुर्दैवाने ते आज आपल्यात नाहीत. त्यांचे पुत्र प्रा.रवींद्र चव्हाण पोटनिवडणुकीत उभे आहेत. त्यांना मते मागण्यासाठी तुमच्यापर्यंत येण्याची गरज भासू देऊ नका, तुम्ही स्वतः त्यांना विश्वास दिला पाहिजे आणि प्रचंड मताधिक्यांनी त्यांना निवडून दिले पाहिजे.

नांदेड दक्षिणचे आमदार मोहनराव हंबर्डे यांना या भागातील जनता नक्कीच निवडून देईल, असा मला विश्वास आहे. जनतेसाठी सदैव तत्पर असलेले व जनतेचे फोन स्वतः घेणारे, थेट संपर्क साधणारे, त्यांच्या समस्या सोडविणारे, जनतेचा आवाज म्हणून ओळखले जाणारे आमदार म्हणून ते परिचित आहेत. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत येणार आहे, त्यासाठी मोहनराव हंबर्डे व नांदेड उत्तरमधून अब्दुल सत्तार यांना विधानसभेत पाठविणे गरजेचे आहे. मी राज्यसभा खासदार म्हणून विकासाची जबाबदारी माझ्यावर घेतो, तुम्ही महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करा, असे आवाहन खा. इम्रान प्रतापगढी यांनी केले.




**नांदेड** : नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीचे भाजप महायुतीचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे व मुखेड विधानसभेचे मतदारसंघाचे भाजप महायुतीचे उमेदवार डॉ. तुषार राठोड यांच्या प्रचारार्थ मुखेड येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा झाली. यावेळी व्यासपीठावर डॉ. अजित गोपछडे, विरुपाक्ष महाराज मुखेडकर, चैतन्य देशमुख, देविदास राठोड, रामराव केंद्रे, बालाजी बच्चेवार, श्रावण पाटील भिलवंडे, डॉ. सचिन पाटील उमरेकर, मारोतराव कवळे गुरूजी उपस्थित होते. (छाया : नरेंद्र गडप्पा)

### खंजरच्या धाकावर व्यापाऱ्याला लुटले

**नांदेड–** सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत तिघांनी एका व्यापाऱ्याला खंजरचा धाक दाखवून दहा हजार रुपये जबरीने काढून घेतले. याप्रकरणी सोनखेड पोलिसांनी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. लोंढे सांगवी येथील व्यापारी मारुती बालाजी लोंढे ११ रोजी कारमधून गावाकडे जात होते. किवळा येथील हनुमंत बबन टर्के, दिगंबर संभाजी टरके आणि ओमकार गोविंद टर्के यांनी व्यापारी मारुती लोंढे यांची कार अडवून खंजरचा धाक दाखवून नगदी दहा हजार रुपये जबरीने काढून घेतले आणि जीवे मारण्याची धमकी देऊन चोरटे पसार झाले. मारुती लोंढे यांच्या फिर्यादीवरून सोनखेड पोलीस ठाण्यात वरील तिघांविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदा नागरगोजे करत आहेत.



**नांदेड** – नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील महायुती-शिवसेनेचे उमेदवार बालाजीराव कल्याणकर यांच्या प्रचारार्थ सुगाव येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या स्नुषा वृषाली शिंदे यांनी मतदारांशी संवाद साधला. यावेळी शिवसेना उपनेते आमदार हेमंत पाटील, राजश्री पाटील यांच्यासह महायुतीतील पदाधिकारी आदी उपस्थित होते. (छायाचित्र : सचिन डोंगळीकर)

# अपक्ष उमेदवार मिलिंद देशमुख यांच्या विजयासाठी माजी नगरसेविका वैशाली देशमुख यांचा डोअर टू डोअर प्रचार

**नांदेड–** प्रभाग क्रमांक ६ व १७ च्या माजी नगरसेविका वैशाली मिलिंद देशमुख यांनी प्रचारात उतरून मतदारांशी संवाद साधणे सुरु केले आहे. प्रचारादरम्यान, त्यांना मतदारांचा चांगला प्रतिसाद लाभत असल्याचे वैशाली देशमुख यांनी सांगितले.




माजी नगरसेविका वैशाली मिलिंद देशमुख ह्यांच्या सोबत शिल्पा देशमुख, छाया देशमुख, प्रणिता कोडगिरे, प्रीती खडकीकर, राखी कुलकर्णी उज्वला पद्मवार, अर्चना देशमुख, सुरेखा देशमुख, अंजली रोडे, अंजली बारबिंड, मीरा सरनाईक, कल्पना देशमुख, अरुणा देशमुख, अरुणा मोरे, अर्चना पाटील, नीता देशमुख, सुनंदा चिंदुलवार, यांच्यासह अनेक महिला सहभागी झाल्या आहेत.

ही टीम सकाळी साडेसात ते रात्री साडेनऊ वाजेपर्यंत शहरी भागामध्ये विविध प्रभागांमध्ये डोअर टू डोअर प्रचार यंत्रणा राबवत आहेत. शहरी व ग्रामीण भागामध्ये मतदारांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे, असे वैशाली देशमुख यांनी सांगितले. महिला प्रचारादरम्यान आपल्या समस्या सांगतात व त्यांनी आत्मीयतेने ऐकून मिलिंद भाऊ आमदार म्हणून निवडून आल्यास प्राधान्याने मी स्वतः करेल असे आश्वासन देत असल्यामुळे किटली या मतदान चिन्हावर आम्ही निवडणूक जिंकू असा आत्मविश्वास त्यांनी यावेळी प्रकट केला.

# नांदेड दक्षिण मतदारसंघातील मतदान अधिकारी, कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण संपन्न

**नवीन नांदेड–** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण नागार्जुना पब्लिक स्कुल, कौठा, नांदेड येथे दि.१२ रोजी संपन्न झाले. या प्रशिक्षणामध्ये जवळपास ११०० कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण घेतले. निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रशिक्षणात मतदान प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण घटकांवर तसेच ईव्हीएम मशीन (इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन) व वीव्हीपॅटच्या (ततझढ) वापरावर विशेष प्रशिक्षण देण्यात आले.



यावेळी डॉ. खल्लाळ यांनी प्रथम क्षेत्रिय अधिकारी यांना मौलिक सूचना देवून मार्गदर्शन केले. त्यानंतर मतदान अधिकारी व कर्मचारी यांना निवडणूक प्रक्रियेतील संपूर्ण माहिती देणाऱ्या लोकविधान पोर्टलचे महत्त्व विशद करुन या पोर्टलचा वापर करण्याचे आवाहन केले. प्रशिक्षण स्थळी जागोजागी या पोर्टलचा वापर करण्यासाठी बारकोड लावण्यात आले होते. यावेळी प्रशिक्षणपीठावर सुप्रिया टवलारे, उपायुक्त मनपा,मनिषा नरसाळे, सहाय्यक आयुक्त मनपा, प्रविण पांडे,तहसीलदार, नितेशकुमार बोलोलु, नायब तहसीलदार, संजय नागमवाड यांची उपस्थिती होती.

मतदान प्रक्रियेतील जबाबदाऱ्या, पारदर्शकता, मतदारांची ओळख तपासणी, गुप्त मतदान प्रक्रिया, मतपेटी हाताळणी, तसेच ईव्हीएम मशीनच्या वापराबाबत ईव्हीएम आणि वीव्हीपॅटची कार्यप्रणाली स्पष्ट करून कर्मचाऱ्यांना मशीनच्या सुसज्जतेबाबत दक्ष राहण्याचे महत्त्व मुख्य प्रशिक्षक संघरत्न सोनसळे यांनी पटवून दिले.

मतदानाच्या प्रक्रियेत काटेकोर पालन करणे कसे महत्त्वाचे आहे यावर भर दिला. ईव्हीएम मशीनची सुरक्षित हाताळणी, मशीन प्रमाणपत्र तपासणे, मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यावर मतपेट्यांचे सुरक्षित हस्तांतरण यासारख्या विषयांवर त्यांनी प्रशिक्षण दिले. तसेच मतदान केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले.

मतपेटी आणि ईव्हीएमची सुरक्षित हाताळणी, मतमोजणी प्रक्रिया, आणि मतदानाच्या वेळी शक्य असलेल्या तांत्रिक अडचणींवर मार्गदर्शन केले. ईव्हीएम आणि वीव्हीपॅट वापराचे तंत्र आणि त्यातील तांत्रिक बाबींसाठी कर्मचाऱ्यांना विशेष निर्देश दिले, ज्यामुळे मतदानाच्या प्रक्रियेत सुलभता निर्माण होईल. यावेळी काही मतदान अधिकारी व कर्मचारी यांनी आपले कथन केल्यामुळे प्रत्यक्ष मतदान केंद्रावर कोणत्या समस्या निर्माण होतात आणि उपाय कोणते, हे सर्वांना समजले. प्रशिक्षण दरम्यान उपस्थित कर्मचाऱ्यांनी मतदान प्रक्रियेत येणाऱ्या संभाव्य अडचणींबाबत प्रश्न विचारले आणि त्यांना तज्ज्ञांकडून समाधानकारक उत्तरे मिळाली.

या प्रशिक्षणामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून, ते आता आगामी निवडणुकी साठी अधिक सज्ज झाले आहेत.

यानंतर एकूण १५ विविध कक्षामध्ये प्रत्येकी ४० जणांस तंत्रज्ञानाचा अचूक वापर करुन प्रत्यक्ष कृतीतून प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण कंटाळवाणे व पाट्या टाकू होवू नये म्हणून आणि प्रशिक्षणार्थ्यांनी सुध्दा सक्रीय सहभाग नोंदविण्यासाठी या आधुनिक तंत्राचा वापर सदरील प्रशिक्षणात करण्यात आला आहे. ही प्रक्रिया राबविण्यासाठी शाळेचे संचालक केशव गड्डम यांनी आपल्या संपूर्ण तंत्रज्ञ टिमसह तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी भरीव सहकार्य केले आहे.

# 'आयएमए'च्यावतीने मतदारांना घवघवीत सूट

## मतदान करा, तपासणीत सूट मिळविण्याचे आवाहन

**नांदेड–** मतदान करणाऱ्या नागरिकांना तपासणीत विशेष सूट देण्यात येणार आहे. तसे निवेदन इंडियन मेडीकल असोशिएशनच्या वतीने महापालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोड यांना देण्यात आले आहे.

२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी आयएमएने विशेष मोहीम हाती घेतली आहे. मतदान करणाऱ्या सर्व नागरिकांना आरोग्य तपासणीत विशेष सूट देण्यात येणार असल्याचे असोशिएशनच्या वतीने कळविण्यात आले आहे.

यात तपासणी फीस म्हणजेच ओ.पी.डी. फीसमध्ये ३०% सवलत तसेच रेडीओलॉजी अंतर्गत येणाऱ्या सिटी स्कॅन, एमआरआय, एक्सरे, सोनोग्राफी, मॅमोग्राफी यासाठी २०% सवलत देण्यात येणार आहे तर विविध प्रकारच्या पॅथॉलॉजी तपासण्यांसाठी ३०% सवलत देण्यात येणार आहे

नागरीकांनी मतदान करून आपली भारतीय लोकशाही आणखी सशक्त व मजबूत करण्यासाठी सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयएमए नांदेडचे अध्यक्ष डॉ. प्रल्हाद कोटकर, सचिव डॉ. राहुल लवहेकर यांच्यासह आयएमएच्या सदस्यांनी केले आहे.

# हिमायतनगरातील अभियंता, लाईनमनच्या मनमानी कारभाराला शेतकरी वैतागले

## विधानसभा निवडणुक मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा

**हिमायतनगर–** खरीप हंगामातील नुकसान भरून काढण्यासाठी शेतकऱ्यांनी रब्बी हंगामाची तयारी करून गहू, हातभार, सूर्यफुल, करडई आदींसह विविध रब्बी पिकांची पेरणी केली. मात्र ऐन रब्बी हंगामाच्या तोंडावर महावितरण कंपनीने अघोषित लोडशेडींग सुरु करून शेतकऱ्यांना हैराण करून सोडले आहे. महावितरण कंपनीचे प्रभारी उपकार्यकारी अभियंता भडंगे, लाईनम पुरी यांच्या मनमानी कारभारामुळं रब्बी हंगामात शेतकरी मेटाकुटीला आला आहे. त्यामुळे अशा अधिकारी, कर्मचायांची तात्काळ बदली करावी, अन्यथा निवडणुकीवर बहिष्कार घालण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

रब्बी हंगामासाठी सुरळीत वीज पुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांना पुन्हा नुकसानीचा सामना करावा लागत असल्याने तीन गावच्या नागरिकांनी दिनांक ११ नोव्हेंबर रोजी थेट महावितरण कार्यालय गाठून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी सांगितल्या प्रमाणे शेतकऱ्यांना २४ तास सुरळीत वीज पुरवठा द्या अशी मागणी केली आहे. यावेळी संतप्त नागरिकांनी उडवा उडावीची उत्तरे देणाऱ्या लाइनमन पुरी यांना घेराव घालत शेतकऱ्यांना सुरळीत वीज पुरवठा देण्यास टाळाटाळ का..? केली जाते. शेतकऱ्यांना केवळ पैश्यासाठी वेठीस धरल्या जाते अश्या प्रकारे खरी खोटी सूनावत शेतकरी बांधवानी महावितरण कर्मचाऱ्याला जाब विचारला आहे.

एवढेच नाही तर महावितरण कंपनीचा प्रभारी कारभार चालविणाऱ्या अभियंता भडंगे व लाइनमन पुरी हे शेतकऱ्यांचे फोन उचलत नाहीत. पैसे दिल्याशिवाय महावितरण कार्यालयाचे अधिकारी लाइनमन काम करत नाहीत. इथे प्रॉब्लेम झाला तिथे प्रॉब्लेम झाला असे सांगून शेतकऱ्यांना परेशान करून सोडतात. आत्तापर्यंत अनेकदा वर्गणी गोळा करून आम्ही पैसे दिले मात्र वीजपुरवठा सुरळीत केला जात नाही. यामुळे रात्रीला जीव धोक्यात घालावा लागत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी महावितरण कार्यालयात पत्रकारांशी बोलताना केला आहे.



शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या अभियंता व लाईनमनची तात्काळ बदली करून शेतकऱ्यांना रब्बीसाठी सुरळीत वीजपुरवठा द्यावा. नाहीतर आम्ही आगामी विधानसभा निवडणुकीत मतदान करणार नाही असा पवित्रा ग्रामस्थ शेतकऱ्यांनी घेतला आहे.

यावेळी सरपंच गुलाबराव राठोड, टांडामुक्त समितीचे अध्यक्ष मारोतराव बोथीगे, पंडित रघुजीवार, दामोधर काळे, पोलीस पाटील विलास डवरे, उपसरपंच धर्तरीनाथ डवरे, मारोतराव खूपसे, अर्जुन जाधव, तिरुपती खरोडे, आनंद मोरे, बालाजी खोकले, नितीन जाधव, भोराजी वागतकर, बळवंत डवरे, बालाजी वानोळे, कोंडबाराव मोरे, नामदेव मोरे, दादाराव डवरे, हरिदास डवरे, उत्तम खरोडे, नागराज खरोडे, नितीन डवरे, जयवंत डवरे, यांच्यासह वाशी, एकघरी परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# ‘टर्टल नेक’ फॅशन

**थोडीशी थंडी सुरू होताच फॅशनप्रेमी युवती, महिला खास हिवाळ्यात घालण्यासाठीचे कपडे आणि ॲक्सेसरीज् कधी आणि कशा वापरता येतील याचा विचार करून ठेवतात. अशीच आवर्जून हिवाळ्यात घातल्या जाणाऱ्या टी-शर्ट किंवा स्वेटरची फॅशन म्हणजे ‘टर्टल नेक’.**




या फॅशनला ‘टर्टल नेक’ का म्हणतात याचं उत्तरही त्याच्या नावातच आहे. गळ्यापाशी पुंगळीसारखी रचना असलेल्या- अर्थात ‘ट्युब्युलर नेकलाईन’ची दोन नावं तुम्ही कदाचित ऐकली असतील. ‘पोलो नेक’ आणि ‘टर्टल नेक’. मजा म्हणजे या दोन्ही फॅशन्स साधारण एकसारख्याच असतात. अमेरिकेत त्याला ‘टर्टल नेक’ म्हणतात, तर युनायटेड किंग्डममध्ये ‘पोलो नेक’ (इथे ‘पोलो नेक’ ही गळ्याची फॅशन आणि ‘पोलो शर्ट’ हा टी-शर्ट या फॅशन्सची गल्लत करू नका बरं! कारण त्या दोन्हीत मात्र काहीच साम्य नाही.) आपल्याकडे ट्युब्युलर नेकलाईनसाठी टर्टल नेक हेच नाव आता रूढ झालं आहे. या फॅशनमध्ये गळा आणि मान झाकली जात असल्यानं कासवानं मान कवचाच्या आत घ्यावी आणि बाहेर काढावी, ती उपमा त्याला देण्यात आली आहे.

## मटेरियल

सर्वसाधारणपणे टर्टल नेक हे स्वेटरच्या कापडात म्हणजे वूलन, विणलेल्या कापडात पुलोव्हर प्रकारात मिळतात. परंतु आपल्याला थंडीत प्रत्येक वेळी स्वेटरची गरज भासेलच असं नाही, त्यामुळे थोड्याशा थंडीत वापरायची असेल तर पॉलिस्टरच्या, लांब बाह्यांच्या टर्टलनेक पुलोव्हर टी-शर्टच्या रूपात ही फॅशन परिधान करता येते. हे पॉलिस्टरचं मटेरिअल वूलन फील देणारं, काहीसं उबदार आणि ‘रिब्ड टेक्स्चर’ असलेलं असतं.

## अशी करता येईल टर्टल नेकची फॅशन

संध्याकाळी किंवा रात्री फिरायला जाताना, प्रवास करताना टर्टल नेक टी-शर्ट किंवा स्वेटर छान मिरवता येतात. हल्ली स्लीव्हलेस टर्टल नेक टी-शट्‌र्स आणि स्लीव्हलेस टर्टल नेक क्रॉपटॉप्सचीही चलती दिसते आहे. स्लीव्हलेस असल्यानं त्यांचा थंडीच्या दृष्टीनं काही उपयोग होत नाही, परंतु ते ‘यंग’ आणि ‘कॅज्युअल’ लूक देत असल्यानं मुलींची त्यांना पसंती दिसते. लांब बाह्यांचे टर्टल नेक टी-शर्ट वा स्वेटर साध्या जीन्सवर छान दिसतातच, पण आणखी काही पद्धतीनं त्यांची फॅशन करायची असेल, तर त्याबद्दल वेगवेगळ्या फॅशनतज्ज्ञांनी काय सांगून ठेवलंय, ते पाहू या...



- ऑफिसवेअरसाठी : ट्राऊझर आणि त्याला सूट होणारं फॉर्मल जॅकेट किंवा ब्लेझर याबरोबर टर्टल नेक टी-शर्ट खूप छान दिसतो. हल्ली अनेक क्षेत्रांमध्ये ऑफिसेसमध्ये कायम ‘फॉर्मल’च कपडे वापरायला हवेत असा नियम नसतो. तिथे डेनिमचे कपडेही वापरले जातात. अशा वेळी रोजच्या जीन्सबरोबर टर्टल नेक टी-शर्ट घालून त्यावर डेनिमचं किंवा इतर कुठलंही कम्फर्टेबल जॅकेट घालून लूक पूर्ण करता येईल.
- ‘कॅज्युअल वेअर’साठी : गुडघ्यापर्यंतच्या किंवा मिडी वा मिनी स्कर्टवरही टर्टल नेक छान दिसतो. यात स्कर्ट जर ‘फ्लेअर्ड’ प्रकारचा असेल, तर वरचा टर्टल नेक अंगाबरोबर बसणारा असावा, असं बहुतेक फॅशनतज्ज्ञ सुचवतात. स्कर्ट घट्ट फिटिंगचा किंवा अंगाबरोबर बसणारा म्हणजे ‘ए-लाईन’ किंवा ‘पेन्सिल’ स्कर्ट असेल, तर टर्टल नेक थोडा ‘ओव्हरसाईज्ड’ म्हणजे घोळदार चांगला दिसेल, असं सांगितलं जातं. जीन्सवर टर्टल नेक टी-शर्ट ‘इन’ करून त्यावर थंडीसाठीचा ओव्हरसाईज्ड कोट घालणंही फॅशनमध्ये आहे. टर्टल नेकची थोडी ‘अनयूज्वल’ अशी फॅशन हल्ली दिसते, त्यात जीन्सवर टर्टलनेक घालून त्यावर आणखी एक पूर्ण बाह्यांचा, कॉलरचा कॉटन शर्ट घातलेला असतो. यात टर्टल नेकचा केवळ नेकच वर घातलेल्या शर्टमधून दिसून येतो. ही फॅशन ऐकायला जरा विचित्र वाटली, तरी ती काही सेलिब्रिटी लोकांकडून केलेली बघायला मिळाली आहे. कदाचित परदेशातल्या अती थंडीवरचा हा फॅशनेबल उपाय असावा.

# कुडकुडीत फॅशन

**फॅशन इंडस्ट्री ही अथांग आहे. त्याला आजच्या काळात कसलीही सीमा, परिसीमा राहिलेली नाही. दिवसागणिक, ऋतुगणिक, माणसागणिक फॅशन बदलत राहते. याचे मूळ कारण आजची तरुण पिढी. त्यांच्यासाठी आणि त्यांच्या मते प्रत्येक क्षणाची फॅशन वेगळी असू शकते. हिवाळा म्हटलं की फॅशनचं परिमाण पूर्णपणे बदलतं, पण हिवाळ्यातील फॅशन सगळ्यात स्मार्ट दिसते अशी आजच्या तरुणाईची धारणा आहे. हिवाळ्यातील फॅशन ट्रेण्ड्सचा घेतलेला हा आढावा**

## डेनिम जॅकेट्स

हिवाळ्यात जरा लूज कपडे घालायला तरुणाईला आवडतं. डेनिम जॅकेट्स हा या मौसमातील सगळ्यात ट्रेण्डी प्रकार आहे. ते घातल्यावर अतिशय स्मार्ट लूक येतो. हिवाळ्यात कॅज्यूअल कपड्यांबरोबर डेनिम जॅकेट परिधान केलं जाऊ शकतं. डेनिम जॅकेट हे ट्रेण्डी वुलन क्रॉप टॉप तसंच टी शर्टबरोबर ट्राय करता येतं. तुम्हाला हव्या त्या साईजमध्ये डेनिम जॅकेट्स मिळू शकतात. शॉर्ट, लॉन्ग, हाफ, फुल, स्लीव्हलेस असे विविध प्रकार आणि रंग आता डेनिममध्ये उपलब्ध आहेत. डेनिमचे जम्पसूटसुद्धा हिवाळ्यात छान दिसतात. छोटीशी ट्रिप, एक दिवसाची पिकनिक किंवा अगदी ऑफिसच्या कॅज्यूअल वेअरसाठी डेनिम जम्पसूट हा उत्तम पर्याय आहे. तुम्हाला इनफॉर्मल, आरामशीर लूक हवा असेल किंवा तुमच्या नेहमीच्या लूकपेक्षा अधिक स्टायलिश आणि लक्षवेधी लूक करायचा असेल तर थंडीच्या दिवसांत डेनिम जॅकेट तुमच्या वॉर्डरोबमध्ये एक अष्टपैलू जोड ठरू शकते. डेनिम हा पाश्चात्त्य संस्कृतीतून आपल्याकडे आलेला प्रकार आहे, पण सध्या भारतातली त्याची लोकप्रियता, आवड आणि वापर इतर कुठल्याही देशांपेक्षा जास्त आहे.

## स्वेट शर्ट्स

हा प्रकारसुद्धा थंडीच्या दिवसांत फार स्मार्ट आणि कुल दिसतो. खरंतर स्वेट शर्ट घालायची सुरुवात नव्या पिढीतील मराठी-हिंदी सिनेतारकांनी केली आणि तेव्हापासून स्वेट शट्‌र्सचा ट्रेण्ड दिवसेंदिवस वाढतो आहे. स्वेट शर्ट मुळात वूलन किंवा थोड्या जाड कापडाचे असतात, ज्याने थंडीत थोडी फार उब मिळते. स्वेट शर्ट हा प्रकारसुद्धा तुम्ही कुठल्याही निमित्ताने घालू शकता. त्यावर छान स्पोर्ट्स शूज आणि मुलींनी केसाची पोनी टेल बांधली की एकदम स्मार्ट लूक येतो. स्वेट शर्टमध्येही अनेक रंग आता पाहायला मिळतात, पण शक्यतो ब्लॅक, ब्ल्यू, व्हाइट असे रंग मुलं आणि मुली दोघांनाही स्मार्ट आणि खुलून दिसतात. स्वेटरच्या तुलनेत हे थोडे पातळ असते, त्यामुळे तुम्ही अगदी उन्हाळ्यातही स्वेट शट्‌र्सचा पर्याय निवडू शकता.

## लेदर जॅकेट्स

हुडीज आणि लेदर जॅकेट्स हा प्रकारसुद्धा थंडीतला ट्रेण्डिंग प्रकार आहे. साध्या टी शर्ट्सवर किंवा अगदी कुठल्याही प्रकारच्या कपड्यांबरोबर तुम्ही जॅकेट्स पेअर करू शकता. लेदर जॅकेटची फॅशन कधीही कालबाह्य होत नाही. लेदर जॅकेट विंटर वार्डरोबमधील सर्वोत्तम स्टायलिश आऊटफिटपैकी एक आहे. डेनिम जॅकेट किंवा स्वेट शर्टपेक्षा हे जॅकेट थोडं जास्त महाग असतं, पण एखादं तरी जॅकेट तुमच्या स्टायलिश कपड्यांच्या कलेक्शनमध्ये असायला हवं. लेदर जॅकेट वापरताना थोड्या फार टिप्स फॉलो करणं गरजेचं आहे, जेणेकरून ते जास्त काळ टिकतं. लेदर जॅकेट प्राण्यांच्या कातडीपासून बनवलं जातं, त्यामुळे ते खरेदी करताना पूर्णपणे माहिती घेऊन आणि तपासून पहा. ते धुण्यासाठी कुठल्याही सोल्यूशनच्या पाण्यात भिजवून धुवा, मशीनमध्ये लेदर जॅकेट धुतलं तर लगेच खराब होऊ शकतं. जॅकेट परिधान करताना आणि कपाटात ठेवताना ते किंचितही ओलसर राहणार नाही याची काळजी घ्या. या जॅकेट्समध्येही वेगवेगळे प्रकार असतात जसं की ओपन झिप, लेदर बॉम्ब, पफर जॅकेट आणि अजून बरंच काही. एकेकाळी जॅकेट फक्त ठरावीक वर्गाची मक्तेदारी मानली जायची, परंतु आता सर्रास कोणीही वेगवेगळ्या पद्धतीने जॅकेट परिधान करू शकतं.





- थंडीतल्या फॅशनची गंमत म्हणजे मुलं-मुली, स्त्री-पुरुष सर्वांनाच सेम पद्धतीचे, स्टाइलचे कपडे वापरतात. कारण जॅकेट्स, हुडी, स्वेटर हे सगळंच कपड्यांच्या युनि-सेक्स प्रकारात येतात. विंटर फॅशनमध्ये अनेक प्रयोग करता येतात, असं तरुणाईचं म्हणणं आहे. हे कपडे कुठल्याही प्रकारे पेअर केले तरी खूप स्मार्ट आणि स्टायलिश दिसतात. आता आपण जरी फक्त कपड्यांबद्दल बोललो असलो तरी हिवाळ्यात शाली आणि स्कार्फ हेसुद्धा तरुणाईच्या कलेक्शनमध्ये पाहायला मिळतात. त्यांचं असं म्हणणं आहे की थंडीत तर ते उपयोगी पडतंच, पण स्कार्फ हा आता रोजच्या जगण्याचा एक भाग झाला आहे. थंडी, धुळ, वारा, ऊन कधीही स्कार्फ हा लागतोच. तरुण पिढी मुळातच शॉपोहोलिकच असल्याने आजकाल सगळ्यांकडेच शाली, कोट्स असे वेगवेगळे प्रकार पाहायला मिळतात.
- हिवाळ्यात फॅशनचं प्रमाण वाढण्याचं कारण म्हणजे तरुणाईची भटकंती. कुठेही फिरताना गरम कपडे (थर्मल्स) घेऊन फिरावं लागतं, त्यामुळे काही जण फक्त थर्मल्स आणि त्यावर जॅकेट्स पेअर करतात, तेही खूप छान दिसतं. तुम्ही जर उत्तरेकडे फिरायला जाणार असाल तर थंडीतल्या कपड्यांची खास तयारी करणं गरजेचं आहे. अंगात घालणाऱ्या कपड्यांबरोबरच कानटोपी, हात मोजे आणि गम बूट्स या बेसिक गोष्टी तुमच्याकडे असणं अतिशय महत्त्वाचं आहे. त्यामध्येही तुम्हाला हवे तसे प्रकार, फॅशन, स्टाइल मिळते. कुडकुडत्या थंडीत फॅशनेबल कपड्यांची हौसही भागवता येते आणि गुलाबी थंडीची मजाही घेता येते. त्यामुळे एकूणच सगळ्या ऋतूंमध्ये हिवाळ्यातील फॅशन तरुणाईला अधिक भावते.

## लॉन्ग कोट्स

लॉन्ग कोट्स पूर्वीच्या काळी स्त्रिया साडीवर परिधान करत असत. त्यानंतर हा प्रकार सिनेमातही बऱ्याचदा पाहायला मिळाला. पूर्वी स्त्रिया बऱ्याचदा महागड्या काश्मिरी पश्मिना कोट्सना अधिक पसंती द्यायच्या. आज त्यामध्येही वेगवेगळे प्रकार आले आहेत. परंतु, अशा पद्धतीचे कोट्स आणि जॅकेट्स यात बराच फरक जाणवतो. हे कोट्स जास्त करून व्हेल्वेट आणि पश्मिना प्रकारात उठावदार आणि राजेशाही दिसतात. आजही ती पद्धत विशिष्ट सामुदायांमध्ये प्रचलित आहे. परदेशात राहणारे, ये - जा करणारे आणि उत्तर भारतात राहणाऱ्यांकडे असे कोट्स हमखास पाहायला मिळतात. उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात मात्र याचा फार उपयोग होत नाही, त्यामुळे अगदी गरज असेल तरच हे कोट घ्यावेत.

# हिवाळ्यात ऑफिसला जाताना घाला हे कपडे

**हिवाळा म्हणजे कोणतीही फॅशन न करण्याचा ऋतू असे म्हटले तरी चालेल. कारण कोणतेही फॅशनेबल कपडे घातले तरीही त्यावर स्वेटर घालावेच लागते. सतत स्वेटर घातले तर सहकारी, मित्र चिडवतात. किंवा आजारी आहेस का असे विचारतात. बर हे ऐकायचे नसेल तर थंडीत एसीतही कुडकूडत बसावे लागेल.**

तुम्हाला माहिती नसेल पण हिवाळ्यात तुम्ही तुमच्या लुकवर अनेक प्रयोग करू शकता. जर तुम्हाला इंडो वेस्टर्न लूक आवडत असेल, तर काही मिक्स मॅचच्या मदतीने तुम्ही असा लुक करू शकता. जर तुम्हाला पूर्णपणे वेस्टर्न स्टाईल हवी असेल तर तेही करता येते. या सर्व लूकमुळे तुमचे संपूर्ण व्यक्तिमत्व तर स्टायलिश आणि मस्त होईलच, शिवाय तुम्ही थंडीपासूनही वाचाल. चला तर मग जाणून घेऊया तुम्ही ऑफिसमध्ये कोणते हिवाळ्यातील कपडे वापरून पाहू शकता



## विंटर वेअर लाँग कोट

ऑफिससाठी विंटर वेअर लाँग कोट स्टायलिश आहे. हे कोट ऑफिससाठीही एकदम परफेक्ट दिसतात. तुम्ही तुमच्या जीन्स, ट्राउझर्स साडीसोबत ओव्हरकोट किंवा लांब कोट देखील घालू शकता. तुम्ही कोट खरेदी करताना डार्क रंग निवडावे. यामध्ये काळा, नेव्ही ब्लू किंवा गडद राखाडी असे रंग कोणत्याही ड्रेसवर उठून दिसतील.

## ब्लेझर

हिवाळ्यात ऑफिससाठी क्लासी लूक ट्राय करणार असाल., तर तुम्ही ड्रेसवर ब्लेझर घालू शकता. त्यावर तुम्ही हायनेक किंवा विंक पुलओव्हर स्टाईल करू शकता. त्यासोबत जीन्स किंवा ट्राउझर्स छान दिसतील. बोल्ड लूकसाठी तुम्ही त्यासोबत लेदरचे बूट ट्राय करू शकता. तुम्ही हे ब्लेजर साडी, शॉर्ट ड्रेस यावरही मॅच करू शकता.

## ट्रेंडी कफ्तान्स

वूलन कफ्तान्सची फॅशन पुन्हा आली आहे. ती शाल आणि स्वेटर म्हणून वापरू शकते. हे इंडियन आणि वेस्टर्न अशा दोन्ही स्टाइलवर चांगले दिसते. जीन्स, साडी, सूट या सगळ्यांसोबत तुम्ही त्यावर कफ्तान्स वापरू शकता.

## वूलन लाँग शर्ट

जर तुम्हाला सगळ्यात हटके लूक हवा असेल तर तुम्ही तुमच्या हिवाळ्यातील ऑफिस लूकमध्ये वूलन लाँग शर्टचा समावेश करू शकता. तुम्ही वूलनच्या लाँग शर्टवर ब्लॅक जीन्स आणि त्यावर फॅन्सी बूट घालू शकता.

# स्टायलिंगचा हिवाळी मोड ऑन! ग्लॅमरस लुकसाठीचे फॅशन ट्रेंड!

**फॅशन ही ऋतूनुसार बदलत असते. हिवाळ्यात लोकरीच्या कपड्यांना फार मागणी असते. या ऋतूत फॅशनप्रेमींना स्टायलिंग करण्यासाठी असंख्य पर्याय उपलब्ध असतात. हल्ली लोकरीच्या कपड्यांमध्ये नवनवीन पर्याय पाहायला मिळतायत. कॅज्युअल वेअर्ससाठी पुलोवर्स, रिब्ड, नायटेड फॅब्रिकच्या कपड्यांना पसंती दिली जाते. तुम्ही जर हट के लुकचे चाहते असाल तर हिवाळ्यातले फॅशन ट्रेंड्स नक्की फॉलो करा**

- पुलोव्हर्स आणतील लुक : सध्या तरुणींमध्ये पुलोव्हर पॅटर्नची प्रचंड क्रेझ पाहायला मिळतेय. पुलोव्हर्सचा फायदा म्हणजे हे कपडे तुम्ही कोणत्याही ऋतूत आरामात घालू शकता. पुलोव्हर टॉप्स वर्षानुवर्षे टिकतात. शिवाय, ते खिशाला परवडणाऱ्या किंमतीत उपलब्ध असतात. या पॅटर्नमध्ये असणारे भन्नाट डिझाइन्स आणि रंग तरुणींना आकर्षित करत आहेत. तरुणांमध्येही पुलोव्हर्सची फॅशन जोमात आहे. शिमर लुक असणारे पुलोव्हर टॉप्स तरुणींना कमालीची भुरळ घालत आहेत. को-ऑर्ड पुलोव्हर्सची सध्या चलती पाहायला मिळतेय. फुल स्लीव्हज, क्रॉप, क्रॉप टॉप, कॅमी, टँक, पिप्लम, ब्लाउज टॉप यामध्ये पुलोव्हर पॅटर्न पसंत केलं जात आहे.
- ट्रेंडी स्वेट टॉप्स : हिवाळा आणि स्वेट टॉप्स हे समीकरण जुनं आहे. पण, बाजारात सध्या स्वेट टॉप्समध्ये स्टायलिश पर्याय दिसतायत. पूर्वी स्वेटर केवळ हिवाळ्यापुरतंच मर्यादित होते. पण, आता कॅज्युअल आणि पार्टीवेअर्ससाठीसुद्धा स्वेट टॉप्सना पसंती दिली जातेय. विशेषतः क्रॉप टॉप्स तरुणींचं लक्ष वेधून घेतायत. स्वेट टॉप्समध्ये फर पॅटर्नला प्रचंड मागणी आहे. टोपी स्टायलिंगमध्ये भर घालते. सध्या ट्रॅक सूट्सची चलती पाहायला मिळतेय.
- हट के नेक-स्लीव्हज : फॅशन करताना व्यक्तिमत्त्वाला शोभेल अशा नेक पॅटर्नची निवड करणं अत्यंत महत्त्वाचं मानलं जातं. रिब्ड टॉप्स आणि टर्टल नेक म्हणजेच हाय नेक यांचं गणित उत्तम जुळतं. टर्टल नेकवर छानसं नेकपिस तुमच्या लुकला चार चांद लावेल. विंटर कलेक्शन टॉप्समध्ये भरपूर प्रकारचे नेक आणि स्लीव्हज डिझाइन्स बाजारात सहजरित्या उपलब्ध होतात. नेकमध्ये वी, ऑफ शोल्डर, कॉलर तर स्लीव्हजमध्ये बलून, कोल्ड शोल्डर, पफ स्लीव्हजना पसंत केलं जातं.
- स्कार्फ दिसेल शोभून : परफेक्ट विंटर लुक करताना स्कार्फला विसरून कसं चालेल? साधारण कपड्यांनाही स्टायलिश आणि हट के लुक देण्याचं काम स्कार्फ करतो. फॅशन जगतात स्कार्फला भरपूर महत्त्व आहे. स्कार्फमुळे तुम्ही आकर्षक तर दिसताच. शिवाय, स्कार्फमुळे नेकपिस किंवा श्रग परिधान करण्याचीही गरज भासत नाही. हिवाळ्यात लोकरीच्या टोपीचीही क्रेझ पहायला मिळते. कारण स्कार्फ गळ्यासोबतच कानाभोवती गुंडाळण्याचा पर्याय असतो. तुमच्या आऊटफिटनुसार स्कार्फची निवड करा. तुमच्या कपाटात किमान एक तरी मफलर किंवा लोकरीचा स्कार्फ असणं गरजेचं आहे, असं स्टायलिस्ट सांगतात.
- जॅकेट्स भारी : फॅशनप्रेमींना कायम भुरळ घालणारा प्रकार म्हणजे जॅकेट. जॅकेट तुमचं व्यक्तिमत्त्व खुलवतं. हिवाळ्यात परफेक्ट विंटर लुक पाहिजे असेल तर पुलोव्हर किंवा रिब्ड पॅटर्नच्या जॅकेट्सची निवड अचूक ठरेल. तरुणांमध्ये झिपर्सची चलती असते. हिवाळ्यात घराबाहेर पडताना हलकंफुलकं जॅकेट तुमच्या सौंदर्याला नक्कीच चार चांद लावेल. तुमच्या पेहरावावर शोभेल अशा जॅकेटची निवड करावी.
- ॲक्सेसरीज फॅशन : केवळ पेहरावातच नाही तर ॲक्सेसरीजमध्येसुद्धा विंटर फॅशनची सरशी पाहायला मिळतेय. बाजारात लोकरीच्या धाग्यांनी विणून तयार केलेले चोकर लक्ष वेधून घेतायत. काही टॉप्ससोबत मॅचिंग चोकर मिळतं. या ऋतूसाठी मुलायम आणि कम्फर्टेबल चपलांची गरज असते. आजकाल फर सँडल्सना पसंती मिळतेय. लोकर किंवा ब्रेडेड बॅग्सचा पर्यायही निवडू शकता. शिवाय, रंगबेरंगी सुतळीच्या बॅग्सही आकर्षक दिसतात.

# प.बंगाल, झारखंडमध्ये १७ ठिकाणी 'ईडी'चे छापे

## बांगलादेशींचे घुसखोरी प्रकरण

**रांची :** बांगलादेशी नागरिकांच्या कथित बेकायदेशीर घुसखोरी प्रकरणाशी संबंधित मनी लाँड्रिंग (पीएमएलए)च्या प्रकरणात झारखंड आणि पश्चिम बंगालमध्ये अनेक ठिकाणी ईडी (सक्तवसुली संचालनालय)ने छापे टाकले. झारखंडमध्ये पहिल्या टप्प्यातील मतदानाच्या एक दिवस आधीच केंद्रीय संस्थेच्या रांची कार्यालयाद्वारे दोन्ही शेजारील राज्यांत एकूण १७ ठिकाणी छापे टाकले. विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ४३ मतदारसंघात बुधवारी तर दुसऱ्या टप्प्यात २० नोव्हेंबर रोजी ३८ मतदारसंघात मतदान होणार आहे. दरम्यान, या छापेमारीवरून राज्यातील सत्ताधारी झामुमो आणि काँग्रेसने भाजपवर सडकून टीका केली आहे.

रांचीतील बरियातू मार्गावरील एक हॉटेल आणि शहरातील एका रिसॉर्टची ईडीच्या अधिकाऱ्यांनी झाडाझडती घेतली. या कारवाईवेळी सीआरपीएफचे पथकही उपस्थित होते. या वेळी ईडी पथकाने हॉटेलमधील दस्तावेज, खातेवह्या आणि आर्थिक विवरणाची पडताळणी केली.

ईडीने 'एक्स'वर जारी केलेल्या निवेदनानुसार, छापेमारीत बनावट आधार कार्ड, पासपोर्ट, शस्त्रे, मालमत्तांचे दस्तावेज, रोख रक्कम, दागिने, प्रिंटिंग पेपर तसेच यंत्र आणि आधार तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा नमुना जप्त केला आहे. दरम्यान, शोध सुरूच असल्याची माहितीदेखील ईडीतर्फे देण्यात आली. झारखंडमध्ये काही बांगलादेशी महिलांची कथित घुसखोरी आणि तस्करीच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी ईडीने सप्टेंबरमध्ये 'पीएमएलए'अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. या वेळी झालेल्या चौकशीत काळा पैशाचा स्रोत उघड झाला होता. यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अन्य भाजप नेत्यांनी घुसखोरीला मदत केल्याचा आरोप राज्य सरकारवर केला आहे. संथाल परगणा आणि कोल्हान विभागातील लोकसंख्येत बदल झाल्याचा मुद्दा भाजपने मांडला होता.

जूनमध्ये रांचीतील बरियातू पोलीस ठाण्यात दाखल दाखल झालेल्या एका तक्रारीनंतर घुसखोरीचे प्रकरण समोर आले होते. या प्रकरणात ईडीने ईसीआयआर (अंमलबजावणी प्रकरण माहिती अहवाल) सादर केला होता. दलालांच्या माध्यमातून भारत–बांगलादेश सीमेतून देशात बेकायदेशीररीत्या घुसखोरी करणाऱ्या एका बांगलादेशी महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी जवळपास सहा महिलांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या महिलांना छाप्यात अटक करण्यात आली होती. तक्रारकर्ती महिलेने तिला ब्यूटी सलूनमध्ये नोकरी देण्याच्या नावावर वेश्यावृत्तीसाठी बांगलादेशातून भारतात आणण्यात आले होते, असे तक्रारीत नमूद केले आहे.

# पोलिसांना टीप; रो–हाऊसमध्ये छापा टाकून २ कोटी ६० लाखांची रोकड जप्त

**मुंबई –** ठाणे पोलिसांनी नवी मुंबईतील नेरुळ पोलीस ठाण्याला नेरुळ सेक्टर १६ येथील एका रो–हाऊसमध्ये बांधकाम व्यावसायिकाच्या घरात रोकड असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरुन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सदरील रो–हाऊसवर छापा टाकण्यात आला असता एकूण २ कोटी ६० लाखांची रोकड सापडली. सुमारे अडीच कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून सदर कारवाई ही निवडणूक आयोगाने आणि ठाणे पोलिसांची संयुक्त मोठी कारवाई केली असून कोट्यवधी रुपयांची रोकड जप्त केली आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. दरम्यान, राज्यात प्रचार कार्याला वेग आला आहे. त्या अनुषंगाने निवडणूकीच्या काळात राज्यातील पोलिसयंत्रणा अर्लट झाली असून प्रत्येक चेकपोस्टवर वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. राज्यात विविध ठिकाणी मोठ्या स्वरूपात रोकड ऐन आचारसंहिता काळात कारवाई करून पोलिसांकडून जप्त केल्या जात असल्याचं चित्र आहे. राज्यात निवडणुकीचा हंगाम सुरू असून सुरक्षा यंत्रणा आणि प्रशासनाने कुठेही गैरव्यवहार होऊ नयेत यासाठी सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. २० नोव्हेंबर रोजी राज्यात आदर्श आचारसंहिता लागू होताच पोलिसांकडून जागोजागी नाकाबंदी करण्यात आली आहे. संशयित वाहनांची कठोरपणे तपासणी करण्यात येत असून अनेक ठिकाणांहून रोकड, मौल्यवान धातू, वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राज्यात 'आदर्श आचारसंहिता' लागू आहे. निवडणुकीच्या काळात मतं मिळविण्यासाठी मतदारांना रोख रक्कम दिली जात असल्याचा विरोधकांकडून आरोप होत असतो. या बाबींना आळा घालण्यासाठी आयकर विभाग, मुंबई पोलीस आणि निवडणूक आयोगाचे कर्मचारी हे गस्त घालत असतात. तसेच छापेमारी करत असतात. त्यातच आता नवी मुंबईमधील नेरुळ सेक्टर १६ येथील रो–हाऊसमधून पोलिसांनी अडीच कोटी रुपये जप्त केले आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नायकवडी यांनी सांगितले की, ''आम्ही एका रो– हाऊसमधून रोख जप्त केली आहे. साधारण अडीच कोटी रुपयांची ही रोकड आहे. ही जप्त केलेली रोकड कोणाची आहे आणि नवी मुंबईत कुठून आली? याचा तपास सध्या पोलिसांकडून सुरू आहे. निवडणूक आयोग आणि पोलिसांनी संयुक्तपणे ही रक्कम जप्त केली आहे''

## बिहारी तरुणाची मुंबईत हत्या

**मुंबई–** गोराई येथे एका तरुणाचा मृतदेह मुंबई पोलिसांना आढळून आला आहे. मृतदेहाचे सात तुकडे करून एका गोणीत भरले होते, ही गोणी रविवारी आढळून आली. आंतरधर्मीय संबंधांतून ही हत्या झाली असावी असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. मुंबई पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मृत तरूणाचे नाव रघुनंदन पासवान (२१) असून तो बिहारच्या दरभंगा जिल्ह्यातील कन्होली गावातला होता.

## बालिकेची विक्री करणाऱ्या चार जणांना अटक

**मुंबई–** कल्याण रेल्वे स्थानक परिसरातील एका मागतेकरी महिलेच्या दीड महिन्याच्या बालिकेची चार लाख रुपयांना विक्री करणाऱ्या बालिकेच्या मागतेकरी आईसह डोंबिवलीतील तीन जणांना ठाणे येथील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या पथकाने कल्याण पश्चिमेतील रामदेव हॉटेलजवळील सहजानंद चौक येथे अटक केली.

वैशाली मूळच्या मालेगावच्या आहेत. दीपाली अनिल दुसिंग (२७, रा. सिध्दार्थनगर झोपडपट्टी), रेखा बाळू सोनावणे (३२) या बालिकेच्या विक्री व्यवहारातील बालिकेची आई आहेत. त्या कल्याण पश्चिम रेल्वे स्थानक भागात राहतात. किशोर रमेश सोनावणे (३४, रिक्षा चालक) अशी महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल व्यक्तींची नावे आहेत.

# दारू, शस्त्रास्त्रांसह ४१ आरोपी ताब्यात

## मतदानापूर्वीच ठाणे पोलिसांची मोठी कारवाई

**ठाणे–** विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी शनिवार, ९ नोव्हेंबर रोजी ऑल आऊट ऑपरेशन राबवले. हे ऑल आऊट ऑपरेशन आयुक्तालयातील पाचही झोनमध्ये राबवण्यात आले. या ऑपरेशन कारवाईत एकूण ३१२ अधिकारी आणि एक हजार २८८ पोलीस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. या कारवाईमध्ये अवैध शस्त्र बाळगणाऱ्या ४१ आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेच्या वेगवेगळ्या दहा पथकांनी रात्री ११ ते पहाटेपर्यंत हे ऑल आऊट ऑपरेशन राबवण्यात आले. त्यात ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी आणि अंबरनाथ परिसरातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांची तपासणी करून त्यांची पोलिसांनी चौकशी केली. या ऑपरेशनवेळी अवैध शस्त्र बाळगणाऱ्या ४१ आरोपींना अटक करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले.

यावेळी ३१ गावठी कट्टे, सात कोयते, पाच तलवारी असे हत्यार जप्त करण्यात आले. तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्यांवर १७९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. या व्यतिरिक्त दारूबंदी कायद्यानुसार ५७ गुन्हे दाखल करण्यात आले असून १८५ जणांवर कारवाई करण्यात आली. तर पाच लाख ७ हजार रुपये किमतीची दारू जप्त करण्यात आली.

ड्रग्ज विक्री आणि सेवन करणाऱ्या विरोधात धडक कारवाई मोहीम राबवण्यात येऊन १५ जणांवर कारवाई करण्यात आली. पाच तास सुरू असलेल्या या मोहिमेत ७४ हॉटेल, ६४ लॉज, ३९ बियर बार, ४२ डान्सबार आदींची तपासणी करून झाडाझडती घेण्यात आली. तसेच एकूण ४७ तडीपार गुंडांना अटक करण्यात आली.

रेकॉर्डवरील ५९ हिस्ट्रीशिटर, ५० तडीपार, ३१ गुंड अशा एकूण १४० गुंडांची तपासणी करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. तर ठाणे शहर पोलिसांच्या वाहतूक शाखेने यावेळी २ हजार १४९ दोषी वाहन चालकांना १८ लाख ५८ हजार ७५० रुपये इतका दंड ठोठावला.

दरम्यान, ठाण्यात बेकायदेशीर होर्डिंग प्रकरणातही महापालिकेने कारवाई केली आहे. नियमांचे उल्लंघन करण्यात आलेल्या, तसंच महापालिकेची फसवणूक करणाऱ्या ५२ जाहिरातदारांवर मोठी कारवाई करत त्यांना तब्बल पाचपट दंड ठोठावला आहे. याप्रकरणी मनसे विधानसभा विभागाध्यक्ष संदीप पाचंगे यांनी फौजदारी कारवाईची मागणी केली होती. त्यानंतर त्यांनी जनहित याचिकाही दाखल केली होती. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आलं असून बेकायदेशीर होर्डिंग उभारलेल्या जाहिरातदारांवर कारवाईचा बडगा उचलण्यात आला आहे.

## माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांना जयंतीनिमित्त आदरांजली



**मुंबई –**काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, थोर स्वातंत्र्यसैनिक, राज्याचे माजी मुख्यमंत्री तसेच माजी राज्यपाल पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित स्व. वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्रदेश काँग्रेस कमिटीचे दादर येथील मुख्यालय टिळक भवन येथे पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी वसंतदादांना आदरांजली अर्पण केली.

वसंतदादा पाटील हे दूरदृष्टीचे नेते होते. आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात त्यांनी महाराष्ट्राला प्रगतीकडे नेणारे अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. सहकार, शेती, शिक्षण, औद्योगिक प्रगतीमध्ये महाराष्ट्राने आज जी प्रगती केली आहे त्याचा पाया वसंतदादा पाटील यांनी घातला होता. वसंतदादा पाटील यांनी १९७७ ते १९८५ या कालखंडात दोनवेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषवले आहे. पाणी आडवा, पाणी जिरवा हा मंत्र वसंतदादांनीच दिला. वसंतदादा पाटील यांचे शिक्षण कमी होते पण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शाळा, महाविद्यालये व व्यावसायिक शिक्षणसंस्था उभारण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे, असे रमेश चेन्नीथला म्हणाले.

## कॅन्सरग्रस्त महिलेच्या मुलाचा डॉक्टरवर चाकुने हल्ला; मुख्यमंत्र्यांचे चौकशीचे आदेश

**नवी दिल्ली–** डॉक्टरांवर हल्ला झाल्याच्या अनेक घटना गेल्या काही महिन्यांत पाहायला मिळाल्या आहेत. आता अशीच एक घटना तामिळनाडूमधील चेन्नई शहरात घडली आहे. चेन्नईमधील सरकारी रुग्णालयात बुधवारी सकाळी एका तरुणाने रुग्णालयातील एका डॉक्टरवर चाकूने वार करत हल्ला केला. या हल्ल्यात डॉक्टर गंभीर जखमी झाले आहेत. या तरुणाने डॉक्टरवर तब्बल सात वार केल्याची माहिती सांगितली जाते. दरम्यान, या हल्ल्याच्या घटनेनंतर सरकारी रुग्णालयातील सुरक्षा आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसंदर्भात चिंता व्यक्त करण्यात आली आहे. अनेकांनी या घटनेचा निषेधही नोंदवला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चेन्नई शहरातील एका रूग्णालयात २६ वर्षीय विघ्नेश या तरुणाच्या कॅन्सरग्रस्त आईवर उपचार सुरु होते. यावेळी विघ्नेश आणि त्याचे तीन मित्र कॅन्सरवर उपचार घेत असलेल्या विघ्नेशच्या आईला भेटण्यासाठी सकाळी १०.३० च्या सुमारास रुग्णालयात दाखल आले. यावेळी त्यांनी आईच्या तब्येतीबाबत डॉक्टर जगन्नाथ यांना विचारणा केली. मात्र, यावेळी त्या तरुणांचा डॉक्टरबरोबर शाब्दिक वाद झाला. यानंतर त्या विघ्नेशने डॉक्टरांवर निष्काळजीपणाचा आरोप केला. त्यानंतर विघ्नेशने चाकू काढला आणि डॉक्टर जगन्नाथ यांच्यावर हल्ला केला. हा हल्ला करताना डॉक्टरच्या मानेवर जवळपास सात वार केले. यावेळी डॉक्टरच्या डोक्याला आणि शरीरावरही जखमा केल्या. मात्र, ही घटना घडत असतानाच त्या ठिकाणी असलेल्या दुसऱ्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करत वाद मिटवत आरोपीला पकडलं. त्यानंतर जखमी झालेल्या डॉक्टरला तातडीने आयसीयूमध्ये दाखल करत उपचार सुरु करण्यात आले. यानंतर घटनास्थळी पोलिसांनी दाखल होत आरोपींना ताब्यात घेतलं आहे. तसेच त्या विघ्नेशबरोबरच्या तरुणांचीही चौकशी पोलिसांकडून करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसनं दिलं आहे.

दरम्यान, यानंतर तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी देखील हा हल्ला धक्कादायक असल्याची प्रतिक्रिया देत जखमी डॉक्टरांवर आवश्यक ते उपचार करण्यात येणार असल्याचं सांगितलं. तसेच या सर्व घटनेची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी प्रशासनाला दिले आहेत. यावेळी ते म्हणाले की, ''आमच्या सरकारी डॉक्टरांचे निस्वार्थी कार्य अतुलनीय आहे. त्यांची सुरक्षितता सुनिश्चित करणं हे आमचं कर्तव्य आहे'', असं म्हणत स्टॅलिन यांनी अशा घटना टाळण्यासाठी भविष्यात उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

## महिला अधिकाऱ्याकडून खंडणी उकळली; चौघांविरोधात गुन्हा

**नवी दिल्ली–** सुमारे ३०० कोटी रुपयांच्या गैरव्यवहारातील रक्कम खात्यात हस्तांतरित झाल्याची भीती दाखवून म्हाडामधील महिला उपअभियंत्याकडून खंडणी उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपींनी सुमारे तीन लाख रुपयांची खंडणी वसूल केली असून याप्रकरणी रवी दहिया, संजय सिंह, गणेश गायतोंडे आणि विजयन अशी नावे सांगणाऱ्या चौघांविरुद्ध खैरवाडी पोलिसांनी फसवणूक, खंडणी, व माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

४१ वर्षांची तक्रारदार महिला प्रतीक्षानगरात राहत असून म्हाडामध्ये उपअभियंता म्हणून नोकरी करतात. ८ नोव्हेंबरला त्या कार्यालयात काम करीत होत्या. यावेळी त्यांना एका अज्ञात व्यक्तीचा दूरध्वनी आला. दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने स्वतःचे नाव रवी दहिया असल्याचे सांगितले. आपण टेलिकॉम ॲथोरिटी ऑफ इंडियामधून बोलत असल्याचे त्याने सांगितले. तुमचा मोबाइल क्रमांक बंद होणार आहे. तुमच्या नावाने एक सिमकार्ड घेण्यात आले असून या सिमकार्डवरून काही लोकांना अश्लील संदेश पाठविण्यात आले आहे, असे त्याने सांगितले. त्यानंतर त्याने तक्रारदार महिलेचा दूरध्वनी दुसऱ्या अधिकाऱ्याकडे दिला.

## आचारसंहिता भंगाच्या ५,२३० तक्रारी निकाली

**मुंबई –** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते १२ नोव्हेंबर २०२४ दरम्यान राज्यभरात सी–व्हिजिल ॲपवर एकूण ५ हजार २८६ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी ५,२३० तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

सी–व्हिजिल ॲपद्वारे नागरिक आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत तक्रार दाखल करू शकतात. हे ॲप कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाउनलोड करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

### जाहीर प्रगटन

### रामनगर सहकारी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म.नांदेड ता.जि.नादेड

रामनगर सहकारी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म.नांदेड ता.जि.नादेड या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२४–२०२९ साठीची प्रारूप मतदार यादी संस्थेचे कार्यालय रामनगर सहकारी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म.नांदेड ता.जि. नादेड येथे लावण्यात आलेली आहे. सदर मतदार यादीवर संस्थेच्या सभासदापैकी कुणाचा आक्षेप असल्यास दिनांक १३/११/२०२४ ते २२/११/२०२४ पर्यंत संस्थेचे अध्यक्ष/ सचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात आक्षेप नोंदवावेत.कृपया सदर तारखे नंतर आलेले आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.याची सभासदांनी नोंद घ्यावी.

**(संतोष के. सरकटे )**
निवडणुक निर्णय अधिकारी
**रामनगर सहकारी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म.नांदेड ता.जि.नादेड**
**मो.९७६७१००५५८**

**(अध्यक्ष / सचिव )**
**रामनगर सहकारी कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म.नांदेड ता.जि.नादेड**
**मो.८२०८१७५९६८**
**७०८३२०७४७०**

### टी.सी.हरवली

माझी गजानन गणपत ताटे या नावाची १० पास टि.सी. नांदेड ते इस्लापूर बस प्रवास करतांना हरवली आहे.सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा. **संपर्क पत्ता– गजानन गणपत ताटे रा. पांगरी पोस्ट इस्लापूर ता. किनवट जि.नांदेड मो. ९५७९४८५६८०**

### Change In Name

My old name is SAMEERA BEGUM I am changing as New name SAMEENA BANO Hance, for my all correspondence will be done as per my New Name please consider the same.Address:- H.N.9-6-633 BAGWAN COLONY NEAR QUBA MASJID DEGLOOR NAKA NANDED 431604 MO.9422188058


### कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८






ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ।।

प्रभ का सिमरनु सभ ते ऊचा ।। प्रभ कै सिमरन ऊधरे मूचा ।।

**गुरुद्वारा तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिब, नांदेड.**



# सिमरन दिवस
# विश्वशांति के लिये अरदास

**15 नवम्बर 2024**

**शाम 04:15 से 04:30 तक**

**मुल मंत्र का पठन कर गुरु साहिब के प्रति अपनी श्रध्दा भेट कर खुशियाँ प्राप्त करें।**

-: विनित :-

**अधीक्षक - गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड.**

Ph.: 02462-234813 I E-mail : contact@hazursahib.com I Visit us at : http://www.hazursahib.com

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# नांदेड उत्तर मतदारसंघात ज्येष्ठ नागरिकांचे गृहमतदान

**नांदेड–** महाराष्ट्रात सार्वत्रिक विधानसभेसाठी २० रोजी मतदान होत आहे. त्या पार्श्वभूमीवर मतदानापासून कोणीही विशेषतः ज्येष नागरिक वंचीत राहू नये यासाठी निवडणूक आयोगाच्या वतीने होम वोटींगची सुविधा प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन मतदान करून घेण्यात आले. या विशेष सुविधेबद्दल ज्येष्ठ नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत.

पूर्वीच्या लोकसभा निवडणूक कामातील उणीव दूर करून निश्चित व नुतन सुधरीत उनिव पूर्णव्हापवे याची कसोशीने दक्षताशीलतेने आगामी विधानसभेच्या निवडणुकीत, लोकसभा पोटनिवडणूकीत दुरुस्ती केल्याबाबत उत्तर नांदेडचे निवडणूक नियंत्रण अधिकारी ललितकुमार वऱ्हाडे उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांचे उत्तर नांदेड वासियांकडून अभिनंदन केले जात आहे.



८५ पेक्षा अधिक वय वर्षे असलेल्या ज्येष्ठ सर्वसामान्य नागरिक असुन देखील अनुराधा गोविंदराव प्रधान पार्डीकर काकू व मालती भुसारी काकू यांचे गृह मतदान करून घेताना पथकातील मायक्रो ऑफरवर तु. बा. पाटील तलाठी गोपीनाथ कल्याणकर , बीएलओ एस. टी. बिद्राळे, व्ही. एन. सोनसळे, बळीराम जाधव तसेच श्रीनगर वासीयातील ज्येष्ठ नागरिकाचे पुत्र संदीप, सून सुनिता देवभक्त, सुरेश कुलकर्णी, शारदा पार्डीकर, समाजसेवक विक्रांत, आंबादास पार्डीकर व्हिडिओग्राफर अमोल मुत्तेपवार तसेच पोलीस अंमलदार आय. जी. शेख हे उपस्थित राहून यांनी गृह मतदान यशस्वीरित्या पूर्ण केले. तसेच आपले कर्तव्य चोख बजावली. तसेच इतर श्रीनगर वासियांना व जनतेला प्रशासन कार्यदक्ष असल्याची जाण करून दिली. येणाऱ्या आगामी पुढील सर्व निवडणुकीत उणीवविरहीत सर्व कामे केली जातील, असे आश्वासन देवून सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदशनाखाली सर्व कामे करीत आहोत.

# दारू पिण्यावरून एकाचा खून

**नांदेड–** नगीनाघाट परिसरात दारू पिण्याच्या कारणावरून दोन भिक्षेकऱ्यांनी दुसऱ्या भिक्षेकऱ्याचा गळा दाबून खून केला. ही घटना २२ ऑक्टोबर रोजी उघडकीस आली होती.

नगीनाघाट येथील गुरुद्वाराच्या बाजूला असलेल्या बंद शौचालयाच्या व्हरंड्यात मोठ्या प्रमाणात भिक्षेकरी राहतात. व्यसनी कलम राज थापा याचा राजेश के. सी. उर्फ आरके आणि हरी थापा यांनी दारू पाजून वाद घालून कलम थापाचा गळा दाबून खून केला. याप्रकरणी वजिराबाद पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. परंतु वैद्यकीय अहवाल आणि उपलब्ध पुराव्यावरून कलम थापा याचा फोन केल्याचे निष्पन्न झाले. वरील दोघांनी खून केल्याचे निष्पन्न झाल्याने राजेश केसी आणि हरी थापाविरुद्ध वजिराबाद पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक बालाजी किरवले यांच्या फिर्यादीवरून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय मंठाळे करत आहेत.

# महायुतीचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांना विजयी करा - केंद्रिय मंत्री गोयल

**नांदेड–** देशाच्या निर्माणात व्यापारी, सिए, आर्कीटेक्ट, इंजिनियअर्स, डॉक्टर्स, वकील यांचे म्हत्वपुर्ण योगदान आहे. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वात देशाची तिसऱ्या जागतीक महासत्तेकडे वाटचाल सुरु आहे. २०४७ मध्ये देश संपुर्ण विकसीत भारत असेल. मोदींच्या नेतृत्वामुळे देशात बद्दल घडत आहे. बदलत्या विकसीत भारतात नांदेडचा सहभाग झाला पाहिजे, यासाठी भाजपा महायुतीचे उमदेवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांना विजयी करा, असे आवाहन केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी केले.




शहरात व्यापारी वर्गाची बैठक घेण्यात आली. याबैठकीला संबोधित करतांना ते बोलत होते. ते म्हणाले की, डॉ. संतुकराव हंबर्डे उच्च विभुषीत आहेत. भाजपाच्या उमेदवारास शैक्षणिक, सामाजीक जाणीवा आहेत. गतीमान नांदेडसाठी डॉ. हंबर्डेना लोकसभेत खासदार म्हणून पाठवा. नांदेड मध्ये मोठी युवा शक्ती आहे. उच्च शिक्षीत युवकांना नांदेड मध्येच रोजगार मिळाला पाहिजे. नांदेड मध्ये कौशल्य विकासावर आधारीत उद्योकाला चालना देवू. गेल्या लोकसभा निवडणूकीतील चुक सुधारण्याची मतदारांना संधी आहे. मराठवाड्याचा विकासासाठी महायुतीकडे मास्टर प्लॅन तैयार आहे. महाविनाशकारी महाआघाडीने मराठवाड्यासह महाराष्ट्राचे वाटोळे केले. मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प पुन्हा सुरू करणार आहे. लातूर मध्ये रेल्वे कोच उभारण्याचा कारखाना सुरू केला आहे. आता सहा दिवसाची योगदानाची गुंतवणूक करा, १७५० दिवस विकासाचा परतावा मिळवा. कोणताही भेदभाव न ठेवता महायुतीला मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी माजी खासदार, आ. हेमंत पाटील, नांदेड दक्षिणचे उमेदवार, आनंदराव पाटील तिडके बोंढारकर, माजी आ. पाशा पटेल, प्रविण साले, दत्तात्रय पईतवार, डॉ. महेश तळेगांवकर, हर्षद शहा, भाजपा व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रेमकुमार फेरवाणी, शितल खांडील, दिपक मोरताळे, दीपक गोयंका , नरेश गोयंका, अली पंजवानी, गांगाबिशन कांकर, विपिन कासलीवाल, जयेश ठक्कर, केतन नागडा, नरेंद्र परमानी आदी उपस्थित होते.

# शनिवारी आनंदराज आंबेडकर यांची नांदेडमध्ये जाहीर सभा

**नांदेड–** लोकसभा पोटनिवडणूक आणि विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन सेनेच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या शहरात १४, १५, १६ व १७ नोव्हेंबर चार सभा होणार आहेत. पहिली जाहीर सभा इंदिरा गांधी मैदान स्टेडियम परिसरात होणार असल्याची माहिती लोकसभेचे उमेदवार प्रा. राजू सोनसळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

लोकसभा पोटनिवडणुकीचे उमेदवार प्रा. राजू सोनसळे यांनी सांगितले की, १४ नोव्हेंबर रोजी भीमघाट, १५ नोव्हेंबर रोजी श्रावस्तीनगर, १७ नोव्हेंबर रोजी जयभीमनगर आणि १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर भागात जाहीर सभांचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय जनता विकास सेनेचे ॲड. शिवराज कोळीकर आणि बहुजन लोकनायक संघटनेचे राहुल चिखलीकर यांनी आपल्याला पाठिंबा दिला आहे. या पत्रकार परिषदेला प्रतीक मोरे, रवी हडसे, अनिल शिरसे यांची उपस्थिती होती.



**नांदेड** : नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना महायुतीचे उमेदवार आनंदबराव बोंढारकर यांनी वडगाव, इंजेगाव आदी गावांतील गावकऱ्यांशी संवाद साधला. (छाया : करणसिंह बैस)

# 'बीआरएस'चे डॉ. दत्ता मोरे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश



**नांदेड–** बीआरएसचे व आम्ही जरांगे चित्रपटाचे निर्माते तसेच दंतरोग तज्ञ डॉ. दत्ता मोरे यांनी जळगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार तसेच प्रदेश उपाध्यक्ष भास्करराव काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवार दि.१२ नोव्हेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ. दत्ता मोरे यांनी किसान ब्रिगेडच्या माध्यमातून शेतकरी आणि शेतमजूरांच्या प्रश्नावर आंदोलन करून आवाज उठवला. तसेच वैद्यकीय क्षेत्रात योगदान देत असतांना ज्वलंत झालेला मराठा आरक्षणाचा प्रश्न जगापुढे मांडण्यासाठी 'आम्ही जरांगे-गरजवंत मराठ्यांचा लढा' या चित्रपटाची निर्मिती केली.

धन-धन श्री गुरु नानक देव जी महाराज के 555 वें पावन प्रकाश पुरब के उपलक्ष में
सभी साध-संगत को हार्दिक बधाईयां...!
गुरुद्वारा सचखंड बोर्ड नांदेड द्वारा आयोजित
स्पेशल चौकी यात्रा








सभी साध-संगत जत्थे बंदियों से बेनती है कि, यात्रा को रवाना करने के लिये
दि. १४ नवम्बर २०२४ सुबह ०८:०० बजे रेल्वे स्टेशन पर उपस्थित रहकर यात्रा की मंगल कामना करें।
चौकी में शामिल सभी यात्रियों को हार्दिक बधाईयां!



विशेष बेनती :- सभी साध-संगत, नानक नाम लेवां जत्थेबंदियों, स्वयंसेवी संस्थाओं तथा प्रतिष्ठित नागरिकों से बेनती है कि स्टेशन पर स्वागत हेतू उपस्थित रहकर संगत के लिये अपनी ओर से अल्पोपहार, पानी इत्यादी की सेवा कर सकते हैं।
तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब, नांदेड से गुरुद्वारा नानकझीरा साहिब बिदर (कर्नाटक)
शुभेच्छुक :- डॉ. स. विजय सतबीर सिंघ IAS (R)
बेनतीकार, गुरु घर का सेवक :- अधिक्षक - गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड.
डॉ. स. विजय सतबीर सिंघ IAS (R)
प्रशासक



संत बाबा कुलवंत सिंघ जी
जत्थेदार साहिब
गुरुद्वारा बोर्ड, तख्त सचखंड श्री हजुर अबिचलनगर साहिब, नांदेड. Ph.: 02462-234813 | E-mail : contact@hazursahib.com I Visit us at : http://www.hazursahib.com

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com